माणूस

शनिवार । २३ ऑगस्ट १९८०

एक रुपया

# ' टाइम्स 'मधील जोडलेख

इंदिरा गांधींनी अलीकडेच केलेल्या दोन घोषणा मोठ्या सूचक आहेत. वृत्तपत्रांनी व राजकीय निरीक्षकांनी–निदान मराठीतल्या तरी–त्यांची दखल घेतलेली मात्र दिसली नाही.

पहिली घोषणा अणुस्फोटासंबंधीची. गरज पडली तर भारत अणुस्फोट करण्यास, म्हणजेच अणुबाँब बनवण्यास मागेपुढे पाहणार नाही असे बाई म्हणाल्या. यापाठोपाठ बाईंनी पाकिस्तानला असेही सांगून टाकले की, काश्मीरचा प्रश्न उकरून काढणे म्हणजे सिमला-कराराचा भंग होय. या दोन्ही घोषणा एकत्र केल्या तर असा समज होतो की, चालू दशकातले भारत-पाक युद्ध जवळजवळ येत चालले आहे काय ?

युद्धाची ठिणगी उडालीच तर आसामप्रश्नाचे लोढणे नको म्हणून अचानक दोन्ही बाजूंनी थोडीथोडी माघार घेऊन वाटाघाटींना सुरुवात तर केली नसावी ?

बॅ. अंतुले यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासाठी निवड झाली, यामागेही हा व्यापक संदर्भ असण्याची शक्यता आहे. पाकिस्तानशी युद्ध म्हणजे मुस्लिमविरोध नव्हे, असेच जणू बाईंनी या निवडीतून सूचित करून ठेवलेले दिसते. अर्थात अंतुले यांची इंदिरा–संजय-निष्ठा, योग्यता व इतर पक्षांतर्गत कारणे या निवडीमागे होती, हे उघडच आहे.

शिवाय देशांतर्गत परिस्थिती अधिकाधिक बिकट होत चाललेली आहे. महागाई आणि बेकारी वाढते आहे. कायदा व सुव्यवस्था ढासळली आहे. जातीय दंगलींनी पुन्हा डोके वर काढले आहे. विभाजनवाद जोरात आहे. हा सारा असंतोष, हे वाढते अराजक आणि ही फुटीरता कशी कमी होणार ? दडपादडपी हा एक मार्ग. आणीबाणीत या मार्गाचे पर्यवसान होते. दुसरा मार्ग युद्धाचा. युद्धामुळे महागाई वाढली तरी बेकारी कमी होते, पडून राहिलेले मालाचे साठे मोकळे होतात व आर्थिक अरिष्टातून तात्पुरती सुटका लाभते. तिसरा मार्ग विकासाचा; पण यासाठी समाजवादी धर्तीचा ठोस कार्यक्रम, राष्ट्रीय चारित्र्य आणि सामाजिक शिस्त हवी. या गोष्टींचा आज पूर्ण अभाव असल्याने पहिल्या दोन मार्गांचा अवलंब होण्याची शक्यताच आपल्या बाबतीत अधिक आहे.

इंदिरा गांधींच्या समर्थकांनी या दिशेने आपल्या लेखण्या वळवायला सुरुवातही केली आहे. गिरिलाल जैन इंदिरा गांधींच्या राजकारणामागील तात्त्विक बाजू नेहमी आपल्या लिखाणातून पुढे ठेवीत असतात. ' Zia provokes Indira ' अशा भडक मथळ्याचा त्यांचा लेख टाइम्स रविवार पुरवणीत (दि. १० ऑगस्ट १९८०) प्रसिद्ध झालेला आहे तो या दृष्टीने पुरेसा सूचक आहे. किंबहुना टाइम्स पुरवणीचे हे सगळे पानच सूचक व बोलके आहे. पानाच्या वरच्या भागात जैन यांचा वरील लेख आहे तर खालच्या भागात तारीक अली या प्रसिद्ध डाव्या नेत्याच्या ' Will Pakistan survive ' या लेखाची योजना करण्यात आलेली आहे. तारीक अली हे सध्या लंडनमध्ये असतात. पाकिस्तानातून त्यांना हद्दपार करण्यात आलेले आहे. त्यांनी खास टाइम्ससाठी हा लेख लिहावा व टाइम्सनेही या →



□ माझ्या आठवणीतले भावे–वि. ग. का. . . . पृष्ठ २

लेखाला गिरिलाल जैन यांच्या लेखासोबतच जागा द्यावी, हा केवळ योगायोग मानणे कठीण आहे. " It is no longer premature to ask whether the policy of befriending Pakistan has run into trouble " असे जैन यांच्या लेखावरची टीप सांगते तर तारीक अलीचे म्हणणे असे की, " The question now is not whether but how long Pakistan can survive..." म्हणजे जैन यांनी सांगायचे की, जनरल झिया आता कुरापती काढू लागलेला आहे, भारत-पाक मैत्रीपर्वाचा पुनर्विचार करण्याची वेळ आलेली आहे आणि तारीक अलींनी पुस्ती जोडायची की, नाही तरी पाकिस्तान आता किती दिवस टिकणार आहे? जैन–तारीकअली ही जोडी प्रयत्नपूर्वक जमवण्यात आली असण्याचीच शक्यता अधिक आहे आणि वारे कुठल्या दिशेने वाहू लागले आहेत हे त्यावरून पुरेसे स्पष्टही होत आहे. तारीक अलीचे म्हणणे तर असे की, काबूलपर्यंत आलेल्या सोव्हिएट सैन्याने आणखी पुढे मुसंडी मारून, पाकिस्तानला झियाच्या लष्करी मगरमिठीतून सोडवले तर बरेच होईल, असे मानणारा वर्गही पाकिस्तानात संख्येने कमी नाही. सिंध-बलुचिस्थानमधील उठावाचीही त्यांनी भलावणच केलेली आहे. या सगळ्याचा परिपाक *येत्या २४ महिन्यात दिसेल, असा तारीक अलीचा अदाज आहे.* दोन 'वर्षे' न म्हणता २४ 'महिने' असा शब्दप्रयोगही मुद्दामच केलेला जाणवतो! वर्षे म्हटल्यावर उगाचच काल लाबल्यासारखा वाटतो आणि तारीक अलीना तर ही पाकिस्तान-विलयाची घटना जेवढ्या लवकर घडून येईल तितकी हवी असावी. यासाठी रशियन फौजांची मदत घेण्यासही त्यांची हरकत दिसत नाही. तारीक अलीचे भाकित खरे ठरते की काय हे पाहायचे. ठरले तर उत्तमच. पण आजवरचा अनुभव निराळा आहे. पाकिस्तानच्या जन्मापासून डावी मंडळी आर्थिकदृष्ट्या हा देश स्वयंपूर्ण होऊ शकत नसल्याने टिकू शकणार नाही, असे म्हणत आलेली आहेत. पण बड्या देशांच्या मदतीने आणि चालू दशकात भुत्तोच्या अमदानीपासून मध्यपूर्वेशी नाते जोडून, पाकिस्तान टिकूनच राहिलेले आहे. तेव्हा तारीक अलींचा आशावाद कागदावरच राहण्याची शक्यता अधिक असे जरी असले तरी नवी दिल्लीची हवा बदलू लागलेली आहे, गरम वारे सुरू होण्याची शक्यता आहे, हा टाइम्समधील जोडलेखाचा गर्भितार्थ नोंद घेण्यासारखा आहे.

□

हे जोडलेख, विशेषत: तारीक अलीचा लेख, पु. भा. भाव्यांनी *वाचला असता तर? ते शक्य नव्हते. कारण १० ऑगस्टच्या* आधीपासूनच ते मृत्यूच्या वाटेवर होते. काही वाचण्याच्या, व्यक्त करण्याच्या अवस्थेत ते राहिले नव्हते. पण पाकिस्तान मोडले पाहिजे असे सातत्याने, कुणाच्याही रागालोभाची पर्वा न करता सांगणारा हा एकमेव साहित्यिक, तारीक अलीचे भाकित वाचून सुखावला असता. भावे तर पाकिस्तानला पाकिस्तानही *म्हणत नसत. त्यांच्या* दृष्टीने ते पापस्तानच होते. हे पाकिस्तान जन्मले आणि भाव्यांमधला साहित्यिक तेव्हापासूनच आपल्याला दिसेनासा झाला. 'मुक्ती', 'सतरावे वर्ष, 'फुलवा' यासारख्या कथा नंतर त्यानी आपल्याला दिल्या नाहीत. नंतरच्या काळात त्यानी जे लिहिले त्यावर पाकिस्तानच्या अस्तित्वाची दाट छाया उमटत राहिली. फाळणीचा घाव ते कधीही विसरू शकले नाहीत. ही जखम त्यांच्या लिखाणातून, भाषणातून सतत वाहत होती. मग ते राजस्थानचे प्रवासवर्णन असो, निर्वासित हिंदू स्त्रीवर लिहिलेली दिवाळी अंकातली एखादी कथा असो किंवा दंगलीनिमित्त लिहिलेला एखादा लेख असो. साहित्यिक हाही शेवटी एक माणूसच असतो. एखादा अनुभव त्याच्या अगदी जिव्हारी झोंबतो, त्याचे भावजीवनच यामुळे उन्मळून जाते. फाळणीच्या *अनुभवाने भाव्यांवर असाच आघात केला.* उत्कटता कमी झाली नाही; पण त्यांची नवनवोन्मेषशालिनी प्रतिभापद्मिनी मात्र फाळणीच्या आगडोंबात जळून गेली! त्यांच्यातल्या कथाकामिनीने जणू जोहारच करून टाकला! काळ पुढे सरकतच होता. हिंदू स्त्रियांवरील अत्याचाराने बेभान होणारे भावे एखाद्या दलित स्त्रीवर झालेल्या अत्याचाराने बेभान होईनासे झाले. *स्वातंत्र्यानंतर समतेचे युग हिंदुस्थानात* उगवू पाहत आहे याचा त्यानी कधी वेध घेतलाच नाही. ते प्रामाणिक असल्याने इतर काही साहित्यिकांप्रमाणे या युगाच्या खोट्या प्रसववेदना त्यानी कधी दाखवल्या नाहीत, हे त्यातल्या त्यात चांगलेच घडले; पण नव्या युगाची चाहूल त्यानी घेतली असती तर निर्भयपणे फासावर चढणाऱ्या *नक्षलवाद्यात त्यांना एखाद्या नव्या* 'मुक्ति'कथेचा नायक सहज दिसला असता. चितोडच्या जोहारांनी भारावून जाणाऱ्या भाव्याना तिरुवनवेलीच्या किंवा बेलछीच्या ज्वाळा दिसल्या असत्या तर? द्रौपदीची विटंबना करणारे हात जाळून टाकण्यासाठी भाव्यांनी सहदेवाला अग्नी आणायला सांगितले होते. बेलछी घडवणारे हात *त्यांना दिसणे अशक्य नव्हते*—ते साहित्यिक


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : विसावे**

**अंक : बारावा**

**२३ ऑगस्ट १९८०**

**किंमत : एक रुपया**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत
असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक
संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर
यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे
छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४५९

असले तरी त्याचे रक्त उसळते होते! उत्कटता हा तर त्यांच्या साहित्याचा प्रधान गुणधर्मच होता. शब्दसंपदा ही तर त्यांची दासी होती; पण ही सारी उत्कटता, हे सारे भाषाप्रभुत्व पुढे एक-देशी, *एककेंद्री झाले, थबकले; ४७ सालच्या पुढे सरकेनासे झाले.* फाळणीने आमच्यातला एक साहित्यिक असा कायमचा घायाळ करून टाकला! त्याच्या प्रतिभेचे गरुडपंख छाटून कापून टाकले. नाहीतर जे रक्त निर्वासिताच्या किंकाळ्यानी तापले, जे अश्रू बलात्कारित हिंदू स्त्रीसाठी ओघळले, ते बेलछीसाठी अनावर झाल्या-शिवाय राहिले नसते. भावे जटायू होते...सीतेला वाचवता वाचवता स्वतःच ते छिन्नविच्छिन्न होऊन जमिनीवर कोसळले. पुन्हा हा जटायू वर उठला नाही, उठू शकला नाही, हे खरे असले तरी अशा वेळी घरट्यात बसून राहिलेल्या अनेक पाखरांच्या अनेक कलापूर्ण कूजनां-पेक्षा हे कोसळणे अधिक महत्त्वाचे व मौलिक होते, यातही काही शंका नाही!

सीतेसाठी छिन्नविच्छिन्न होऊन मरण पत्करणाऱ्या या एका *जटायूला तारीक अलीचा लेख वाचून खरोखरच काय वाटले असते?*

¤

जटायू भाव्यांना वाटले असते की, तारीक अली हा आपल्या-कडील डाव्या मंडळीप्रमाणेच पाकिस्तान का निर्माण झाले, पाकिस्तानची ताकद कशात आहे, हे न समजलेला एकाक्ष विरोधक आहे. अंतर्गत बंडाळ्यानी पाकिस्तान पोखरले जावो, की तेथे *महागाई–बेकारी भयकर वाढलेली असो, धर्माच्या आधारावर* हे राष्ट्र अजूनही बराच काळ आपले अस्तित्व टिकवून धरल्याशिवाय राहणार नाही! आपापसात इस्लामधर्मीयात कितीही मतभेद आणि वैर असो, हिंदुस्थानविरुद्ध नेहमीच सगळा इस्लाम एक होत राहील. आता तर मध्यपूर्वेची प्रचंड संपत्ती 'मुस्लिम ब्रदरहुड'साठी उपलब्ध आहे. मुळातच आक्रमक आणि विजिगीषु असलेल्या इस्लाम-*धर्माला आता एका नव्या जगज्जेतृत्वाच्या आकांक्षेने फुलवलेले आहे;* हिरवा चाँद पुन्हा जगावर फडकवण्याची स्वप्ने इस्लामधर्मियांच्या डोळ्यासमोर तरळू लागलेली आहेत. महंमद पैगंबरांनंतरचा इति-हास थोडा चाळून बघावा; शंभर–सव्वाशे वर्षांतच आफ्रिकेचा किनारा व्यापून, युरोपात स्पेनपर्यंत इस्लामने धडक मारली होती आणि इकडे पूर्वेच्या बाजूला, महंमद बिन कासमच्या अरबी घोड्यांनी सिंध प्रांत *आपल्या टापाखाली आणायला* सुरुवात केली होती. पुन्हा ते विजयपर्व लिहिण्याची, तसा पराक्रम गाजवण्याची महत्त्वाकांक्षा इस्लामी अंत.करणात जागृत झालेली आहे आणि पश्चिमेचे ज्ञानविज्ञान, तेलाचा अमाप पैसा आणि कधीही विचलित न होणारी धर्मश्रद्धा याच्या बळावर, ही महत्त्वाकांक्षा पूर्ण करून घेण्याची क्षमताही आता इस्लाम बाळगून आहे. असा एक आक्रमक *पवित्रा जगभरच्या इस्लामने घेतलेला असताना पाकिस्तानसारखे* भारताच्या उरावर बसवून ठेवलेले राष्ट्र कोलमडू दिले जाईल, इतर इस्लामधर्मी राष्ट्रे किंवा अमेरिकेसारखी महासत्ता ते घडू देतील, यावर तारीक अलीसारखा विश्वास ठेवणे कठिण आहे. पाकिस्तान कोलमडणे चांगलेच आहे; पण तेथे चीन–अमेरिका किंवा एखादा खोमेनी ठाण मांडायला येणार असतील तर त्या *कोलमडण्याचा आपल्याला उपयोग काय,* हाही प्रश्नच आहे.

भारतानेच खैबरपर्यंत आपले प्रभावक्षेत्र विस्तारायला हवे खैबर हाती नाही तोवर दिल्लीही सुरक्षित नाही, हे जुन्या काळापासून मान्य झालेले ऐतिहासिक-भौगालिक सत्य आहे व आज नाही उद्या *या सत्याचा स्वीकार भारतीय राजनीतीला करावा लागणार आहे.* उगाच नाही मोगल बादशाह, स्वतः मुसलमान असूनही, मध्यपूर्वेतील टोळधाडींना अफगाणिस्तानच्या सीमेवर अडवून ठेवण्यासाठी सतत तिकडे सैन्ये पाठवीत राहिले आणि नंतर आलेल्या ब्रिटिशांनीही, रशियाला खैबरपलीकडे रोखून ठेवण्यासाठी, एक नाही, दोन नाही, तीन अफगाण–युद्ध भारतावर लादली होती! पाकिस्तानद्वारा संपूर्ण *भारतीय उपखंडावर सतत दाब ठेवता येतो म्हणून* जगातल्या महा-सत्ता आणि उदयास येत असलेला नवा मुस्लिम साम्राज्यवाद पाकिस्तानच्या रक्षणासाठी सदैव सिद्धच असेल! एखादे भारत–पाक युद्ध होईल–जसे ते यापूर्वीच्या प्रत्येक दशकात झाले आहे. एखाद्या युद्धात आपल्याला जयही मिळेल–जसा तो बंगलादेश युद्धात मिळाला होता; पण पाकिस्तान नष्ट होण्याची शक्यता या दशकात *तरी कमीच! त्यासाठी भारत स्वावलंबी, समर्थ व एकात्म व्हायला* हवा. मुस्लिम अनुनयाचा कांग्रेसी वारसा झिडकारून देणारी सत्ता दिल्लीत असायला हवी. इथल्या मुसलमानांना भारत हीच आपली पितृभू आणि पुण्यभूही वाटायला हवी. हिंदूनाही आपल्यातली सामाजिक विषमतेची दरी बुजवण्यात यश यायला हवे. हे सगळे झाले नाही तर पाकिस्तान मोडूनही आपल्याला फायदा शून्यच! *उलट बाहेरचे दुखणे घरात घुसण्याचा धोका अधिक. तो टाळायचा* असेल आणि खैबरपर्यंतच्या क्षेत्रावर भारताचा प्रभाव प्रस्थापित करा-यचा असेल तर प्रथम सामाजिक पातळीवर एकात्मता व अखंडता कशी निर्माण होईल, हे पाहिले पाहिजे. भारतातच आज छोटी–मोठी पाकिस्ताने, ख्रिस्तीस्ताने निर्माण होऊ पाहत आहेत. त्याचा बीमोड होऊन सारा भारतीय समाज एकसंघ आणि अनुशासनशील झाला *तर अखंड भारत व्हायला कितीसा वेळ लागणार आहे?* केवळ आणखी एखादे भारत-पाक युद्ध झाल्याने किंवा त्यातील जयपरा-जयाने हे साध्य होणार नाही. समाजाचे एकात्मीकरण प्रथम झाले पाहिजे. प्रदेशाचे नंतर आपोआप नाही तरी अल्पशा प्रयत्नानी होऊ शकते. गोवा नाही का भारतात विलीन झाला? पण तत्पूर्वी तेथील आणि येथील जनतेत तशी जागृती निर्माण करण्याच्या कार्यास अधिक जोमाने वाहून घेणे हीच भाव्यासारख्या हिंदुत्ववादी साहित्यिकाला खरी श्रद्धांजली ठरेल!

¤

भाव्यानी सहदेवाला अग्नी आणण्यास सांगितले होते
उद्याचे नवे हिंदुत्ववादी त्या अग्नीची प्रार्थना करतील,
म्हणतील—

'अग्ने नय राये सुपथान अस्मान्'

'हे अग्ने, आम्हाला प्रगतीच्या, समृद्धीच्या मार्गाने घेऊन जा'

–श्री. ग. मा.

# माझ्या आठवणीतले भावे

वि. ग. कानिटकर

१३-८-८० 'आज पहाटे पु. भा. भावे गेले!' काही दिवसांपूर्वी त्यांना तीव्र स्वरूपाचा हृदयविकाराचा झटका आल्याचे वृत्त आले होते. त्यानंतर सांगोवांगी कळलेल्या हकिगतीवरून त्यांची स्थिती चिंताजनक आहे हे कळत होते. अखेर आज पहाटे हा झंझावती पुरुष कालवश झाल्याचे आताच आकाशवाणीवरून कळले.

भावे कथाकार होते. कादंबरीकार होते. नाटककार होते आणि प्रभावी पत्रकारही होते. अगदी प्रथम भाव्यांच्या लेखनाने मला मोहिनी घातली ती त्यांच्या पत्रकारी लेखनाने.

फाळणीपूर्वीचा तो काळ होता. ४३–४४ साल असावे. फॉम 'क्विट इंडिया टू स्प्लिट इंडिया ही सावरकरांनी दोन वर्षांपूर्वीच उच्चारलेली भविष्यवाणी तंतोतंत खरी करण्याच्या प्रयत्नात आणि पवित्र्यात सर्व काँग्रेसी नेते होते. समाजवाद्यांना फाळणी ना मान्य ना अमान्य होती! सावरकरांना जातीय ठरवून त्यांना शिव्याशाप देण्यात, या मंडळीत अहमहमिका असे. आ. अत्रे हे त्या वेळी स्वतःला समाजवादी म्हणवत. आज सर्वज्ञात झालेली या मंडळींची सर्व बाणे आणि दुर्गुण त्यांनी पत्करले होते. जसजसा मुसलमानांचा जातीयवाद उफाळत होता आणि फाळणीचे वेध लागत चालले होते, तसतशी अखंड भारतासाठी होणारी अखेरची किंकाळी अधिकाधिक आर्त होत होती. आणि नतद्रष्ट हिंदूंचे दुर्दैव असे, की जो सत्य निर्भीडपणे मांडीत होता, त्याच देशभक्तावर थुंकण्यात काँग्रेसी नेते धन्यता मानीत होते. आयुष्यभर स्वार्थाच्या गटारात लोळणारी सूकरे, सावरकरांना 'काचेच्या कपाटातील सिंह' ठरवून हिणवत होती. 'नवयुग' पत्रांतून सावरकरांवर होणारी गलिच्छ टीका रोखणारा अन्य पत्रकार, पश्चिम महाराष्ट्रात नव्हता. अत्रे पत्रकार म्हणून प्रभावी होते. लेखक आणि नाटककार म्हणून लोकप्रिय होते...आणि म्हणून सगळे खपून जात होते.

अशा वेळी नागपूर येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'आदेश' या साप्ताहिकाने आ. अत्रे यांच्यावर आसूड सुरू केले. या पत्राचे संपादक होते–पु. भा. भावे. 'आदेश' काढण्यापूर्वी 'सावधान' या पत्रातून पु. भा. भावे लिहीत असत. परंतु 'सावधान' अल्पजीवी ठरले. मला आठवते दादर स्टेशनसमोर इराण्याच्या हॉटेलबाहेर कोपऱ्यावर जे वृत्तपत्राचे दुकान होते तिथे 'सावधान' मिळायचा. हा अंक येण्याची मी वाट पहात असे. या पत्राचे बरेच अंक माझ्या संग्रही होते. क्वचित भगव्या कागदावर देखील हे पत्र छापलेले असायचे. हे सर्व अंक–गांधीवधोत्तर दंगली सुरू होताच मी जाळून टाकले. ही हकीगत सवडीने लिहीन. परंतु या 'सावधान' पत्राचे सौभाग्य मावकर होते. 'सावधान' बंद होताच भावे यांनी 'आदेश' सुरू केला. अत्र्यांची उमट लेखणी भावे यांनी बोथट करून टाकली. अखेर नाइलाजाने अत्रे यांनी भावे यांचेवर अब्रुनुकसानीची फिर्याद लावली.

रुईया कॉलेजातले तास बुडवून आम्ही काही विद्यार्थी 'अत्रे आदेश' खटला ऐकायला गर्दी करायचो. प्रे. मॅ. सबनीस यांचे कोर्टात दादरलाच हा खटला चालत होता असे आठवते. या खटल्यात अत्रे यांची फटफजिती सुरू झाली. भावे हे स्वतः वकिलीची परीक्षा दिलेले होते. फिर्यादी पक्षाला अब्रूच नसल्याने, त्यांची नुकसानी ती कशी होणार! अशा पद्धतीने हा खटला चालायचा! अत्रे नामोहरम झाले. त्यांनी खटला काढून घेतला. आम्हाला विलक्षण आनंद झाला. सावरकरांची नालस्ती करणाऱ्या अत्र्यांना यापेक्षा मोठी शिक्षा व्हायला हवी होती असे वाटायचे. या सर्व त्या वेळच्या भावना मी सांगतो आहे.

सावरकर हे प्रामाणिक टीकेचे विषय होऊ शकतात. परंतु एक तर ती टीका प्रामाणिक हवी. किंवा टीकाकार प्रामाणिक हवा. अत्र्यांची टीका ही सर्वस्वी अप्रामाणिक होती. 'आदेश'मधले पु. भा. भावे यांचे अत्र्यावरील टीकालेखन ही सावरकरांविषयी. सीमेची शिवराळ व अप्रामाणिक विधाने करणाऱ्या 'नवयुग' ला एक प्रेमाची परतभेट होती– असे भावे यांनी म्हटले आहे ते सत्य होते. अत्र्यांनी अनेक दीन–बापडे नाडले– नागवले. भाव्यांनी हा उन्मत्त वारू जेरबंद केला. वस्त्रहरणाचा इतका साप्रसंगीत प्रयोग माझ्या स्मरणात नाही. सासवडचा वस्तरा आणि हिंदुत्वाची समशेर यांची ही लढाई होती.

तेव्हापासून भावे यांच्यावर माझी भक्तीच जडली. परंतु कथाकार म्हणून भावे यांनी लवकरच मराठी साहित्यात धडाक्याने पदार्पण केले. 'पहिला पाऊस', 'सतरावे वर्ष', 'सीमेवर', 'मुक्ती', 'पुतळा' अशा त्यांच्या कथांनी मराठी कथेत विलक्षण सुगंध दरवळू लागला. स्त्री पुरुषसंबंधाचे आवर्त त्यांनी विलक्षण हळुवारपणे रंगवले. त्यांनी कथा कवितेच्या समीप नेऊन ठेवली. अग्रगण्य कथाकारांत भावे दाखल झाले. पत्रकार भावे यांचेपेक्षा कथाकार भावे मनाच्या गाभाऱ्यात अधिकच खोल शिरले. त्यांच्या कथांची वाट पहाणाऱ्या असंख्य वाचकांतला मी एक झालो होतो.

भावे कादंबरीकडे वळले. 'अकुलिना', 'वर्षाव' या त्यांच्या कादंबऱ्यांनी त्यांच्या कथांसारखेच मला झपाटून टाकले. मला आठवते, 'वर्षाव' वाचली तेव्हा मी बडोदे येथे होतो. केव्हा तरी अपरात्री मी कादंबरी संपवली तेव्हा मला अश्रू आवरत नव्हते. सुन्न करून टाकण्याची शक्ती असलेल्या माझ्या लेखी एकच लेखक होता–पु. भा. भावे. गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, गोखले सर्वच आवडत; पण या सर्वांत भावे निराळे वाटत.

याआधी काही दिवस मी भावे यांच्या एका कथेवरून एकांकिका लिहिण्याचा उपद्व्याप केला होता. अगदी सामान्य व जुजबी असे हे लेखन होते. एकांकिका काही हौशी मंडळींनी बसवली होती. मला प्रयोगासाठी भाव्यांची परवानगी हवी होती मी व शं. ना. नवरे या वेळी एकाच कचेरीत काम करत होतो. शं. ना. यांचेमार्फत मी भावे यांना परवानगीसंबंधी विचारले. निरोप आला की भावे हे स्वतःच या कथेवर तीन अंकी नाटक लिहीत आहेत. कालांतराने हे नाटक त्यांनी लिहिले. हे नाटक म्हणजे 'स्वामिनी'. माझ्यापुढे

त्यावेळी प्रश्न पडला आता एकांकिकेच्या प्रयोगाचे काय करायचे? मी भावे यांना पत्र लिहिले व एक प्रयोग करण्याची परवानगी त्यांनी दिली. १९५३–५४ मधली ही गोष्ट असेल.

भावे हे उत्तम वक्ते असल्याची ख्यातीही पसरलेली होती. विशेषत: फाळणीपूर्वी त्यांनी 'नौखाली'चा दौरा केला आणि नंतर जी व्याख्याने दिली, त्यामुळे ही प्रसिद्धी जास्त झाली. 'नौखाली'त गेलेला हा एकमेव मराठी लेखक होता! परंतु त्याची ही व्याख्याने ऐकण्याचा योग मला लाभला नाही. मुंबई-पुण्याशी आता अधून-मधून संबंध येत होता. अशाच एका मुंबईभेटीत, मी भावे यांचे 'गडकऱ्यांची सिंधू' या विषयावरचे एक व्याख्यान गिरगावात ऐकायला गेलो. भावे यांचे व्याख्यान मी प्रथमच ऐकत होतो आणि भावे यांनी माझी काहीशी निराशा केली. अतिशय बटबटीत असे पातिव्रत्याचे चित्र भावे भाषणात रंगवत होते. अस्तंगत आणि कालबाह्य झालेल्या गुणांना भावे समर्थपणे कुरवाळीत होते. हे सर्व ऐकताना भावे यांनी असे बोलू नये असे वाटत राहिल्याने मला खिन्नता आल्याचे स्मरते आणि काय योगायोग असेल तो असो–यानंतर भावे यांची जी जी व्याख्याने मी ऐकली, त्यामुळे प्रभावित झाल्याचा अनुभव मला कधी आलाच नाही. कदाचित याचा दोष माझ्याच आकलनशक्तीचाही असेल!

वर्षांमागून वर्षे जात होती. भावे लिहीत होते. ज्या काही मराठी लेखकांचे जवळजवळ सर्व लेखन मी वाचलेले आहे त्यात भावे एक होते. त्यांचा 'सौभाग्य' हा चित्रपटही मला विलक्षण आवडला. १९५९ च्या डिसेंबरात मी पुण्याला आलो आणि 'माणूस' साप्ताहिकाशी माझा संपादनसंबंध आला. यामुळे ग. दि. माडगूळकर यांचा परिचय झाला. ग. दि. मा. आणि भावे यांची मैत्री घनिष्ठ आणि 'मेनका' मासिकाचे संपादक पु. वि. बेहेरे आणि कुलकर्णी ग्रंथागाराचे पंडित कुलकर्णी हे या उभयतांच्या जवळचे. एकदा ग. दि. माडगूळकर, पंडित कुलकर्णी, पु. वि. बेहेरे आणि मी अशा चौघांनी पवना–जलाशयावरील डाकबंगल्यात, एक रात्र घालवण्यासाठी जाण्याचा बेत ठरला आणि त्याच दिवशी अचानक पु. भा. भावे हे माडगूळकरांकडे आले. ग. दि. मां. चा फोन आला–'भावेही बरोबर येत आहेत!'

या वेळी प्रथम भावे यांच्या सहवासात मी आलो. आम्ही डाक-बंगल्यावर पोचलो तेव्हा सायंकाळ झालेली होती; परंतु पौणिमा असल्याने आसमंत हळूहळू उजळत चालले होते. पवनेचे खोरे हे मोठे रम्य ठिकाण आहे. सर्व अंगांनी डोंगरकडा आहे. लोहगडाच्या कुशीतले हे स्थान हाताच्या तळव्यातल्या पेंबासारखे टपोरे आहे.

डाकबंगल्याभोवतीच्या बागेत आम्ही गेल्या गेल्या फेरफटका मारला. भावे खुषीत होते. ग. दि. मा. सारखे म्हणत होते–'अरे, इथे एखादा ठोंब्या आणून ठेवला तरी त्याला कविता सुचेल! काय भावेअण्णा?'

'यस्, सुचेल. सुचेल'–भाव्यांची तंद्री लागत चालली होती.

तासाभराने आम्ही बंगल्यात आलो. एकदम लक्षात आले की भावे कोठे दिसत नाहीत. त्यांच्या चपला तर दारात दिसत होत्या. आम्हाला वाटले–असतील इकडे तिकडे कुठे तरी. तितक्यात बंगल्याचा खानसामा भोजनाची वर्दी घ्यायला आला. त्याला मी सहज म्हटले–

'काय रे बाबा–इथं साप-बिप असतात का?'

'साप फार निघतात साहेब! संध्याकाळी गारव्याला बाहेर येतात. म्हणून तर बंगल्याभोवती वाळू टाकलीय.'

जेवणाला अद्याप दोन-तीन तास तरी होते. काही वेळापूर्वी भावे यांना मी हे सांगितले होते. हा गृहस्थ अनवाणी, चांदण्यात भटकायला तर गेला नसेल एकटाच? मला शंका येताच मी बाहेर पडलो. बंगल्याच्या फाटकापाशी जाऊन चौकीदाराला विचारले–

'इथून बाहेर गेले का रे कुणी?'

'हां–तुमच्याबरोबर आलेले एक साहेब गेलेत. पार धरणाच्या बाजूला गेलेत.'

मी आत येऊन ग. दि. मां. ना म्हटले–

'आता काय करायचं?'

'काय झालं?'

'अहो, भावे अनवाणी धरणाकडे गेलेत! इथं सापाची धास्ती आहे.'

'अनवाणी गेला का? बेहेरे–कुलकर्णी, अरे पकडून आणा त्याला! म्हणावं मरायचंय काय?'

अर्ध्या पाऊण तासाने भावे डुलत डुलत आले. गात होते. हातात ओंजळभर फुले होती.

'घ्या. मित्रांनो, फुलं घ्या–'

फुलं टेबलावर पसरली गेली. ग. दि. मा. म्हणाले–'फुलं आणायला कशाला गेलात? सापबिप चावला असता म्हणजे! बाकी तुम्हाला काही व्हायचं नाही. साप मरायचा!'

ती रात्र गप्पांची होती. मध्येच आठवण. मध्येच साहित्यचर्चा. भावे चक्क गात होते. आश्चर्य म्हणजे त्यांचा आवाज चांगला सुरल वाटत होता. ग. दि. मा. कविता म्हणत होते. साथीला मद्य होते. बाहेर चांदणे होते. जेवण उरकून अंथरुणावर पडायला पहाट झाली.

सकाळी उठायला तसा उशीरच झाला. सात वाजता चहा आला तेव्हा मी आणि ग. दि. मा. च फक्त चहा घ्यायला तयार होतो. बेहेरे आणि पंडितराव यांची झोपण्याची व्यवस्था जरा दूर होती. ते अजून उठलेले नव्हते. आमचा चहा होतो ना होतो तो भावे उठून आले. त्यांना चहा नको होता, त्यांच्या हातात उर्वरित मद्याची बाटली होती.

ग. दि. मा. म्हणाले–

'भावेअण्णा, ठेवा ते बाजूला. चहा घ्या–चहा!'

भावे समोरच बसले.

'स्वामी–मद्य फुकट जाणे मला पाहवत नाही. चहा तुम्ही घ्या!'

सकाळी दहाच्या सुमारास आम्ही पवनापरिसर सोडला. मोटारीत भावे मला पुन: पुन: म्हणत होते–'पुन: इथं यायचं. छान परिसर आहे. आवडला!'

१९७६ च्या मार्चमध्ये मी साहित्यपरिषदेच्या कार्यकारिणीवर निवडून आलो. चिटणीस झालो. अध्यक्ष ग. दि. मा. झाले. यामुळे भावे यांची कधी तरी गाठ पडायची. ग. दि. मा. बरोबर भावे परिषदेत यायचे. ७६ चे साहित्यसंमेलन पुण्यात भरणार होते. नुकतीच आणीबाणी संपलेली होती आणि आणीबाणीच्या दर्द-

भूमीवर प्रभाकर पाध्ये याचे नाव 'सोबत' मध्ये ग. वा. बेहेरे यानी अध्यक्षपदासाठी पुरस्कारले होते. त्या वेळी इतर कुठलेच नाव पुढे आलेले नव्हते. मी व्यक्तिश: पाध्ये यांना मत देणार होतो; परंतु अवचित अध्यक्षपदासाठी आणखी दोन नावे आली. एक पु. भा. भावे यांचे आणि दुसरे गंगाधर गाडगीळ याचे. नावे मागे घेतली जातील ही अपेक्षा फोल ठरून अखेर अध्यक्षपदाच्या निवडणूकरिंगणात पाध्ये, भावे व गाडगीळ हे तिघेही राहिले. मी माझे मत प्रभाकर पाध्ये यांनाच देणार असलो तरी पु. भा. भावे यांचा पराभव मला अशक्य वाटत होता.

निवडणुकीला समाजवादी मंडळींनी पद्धतशीरपणे राजकीय रंग दिला. भावे याना साहित्यसमेलनाचे अध्यक्षपद निवडून आल्यास मिळणार होते, तो त्यांच्या ललितलेखनाचा गौरव ठरणार होता. अर्थात भावे याच्या जबर व्यक्तिमत्त्वातून त्यांची राजकीय मते वेगळी काढणे शक्य नव्हते. त्यांच्या वक्तव्यात ती डोकावणे अपरिहार्य होते. मोजूनमापून बोलायचा त्यांचा स्वभाव नव्हता. याचे भांडवल समाजवादी मंडळींनी केले. तरीही भावे घवघवीत बहुमताने निवडून आले.

भावे निवडून आल्याने व्यथित झालेल्या आततायी समाजवाद्यांनी मग संमेलनात गोंधळ घालण्याचा डाव टाकला. दलितांना भडकवून, त्यांनी संमेलनाच्या अखेरच्या कार्यक्रमात गोंधळ माजवून संमेलनाला गालबोट लावले. साहित्याच्या ध्यासापायी आपले सर्व आयुष्य ओवाळून टाकलेल्या, एका प्रतिभासंपन्न साहित्यकाराचा असा अपमान करून समाजवादाची वाटचाल किती पुढे गेली हे केवळ ते समाजवादीच जाणोत! त्या वेळी मी व्यासपीठावर होतो. भावे यांना ऐकू येण्याची अक्षमता असल्याने, समोर काय चालले आहे याचा बोध त्याना होत नव्हता. दीनवाणेपणाने, हताशपणे ते सर्व पाहत होते. काही क्षणांतच ते व्यासपीठावरून निघून गेले!

असे व्हायला नको होते.

यानंतर भावे याच्याबरोबर प्रदीर्घ गप्पा मारण्याची एकच संधी लाभली. नंतर भेटीगाठी झाल्या; पण गप्पा झाल्या नाहीत. माझा भाऊ-यशवंत याचे साहित्य परिषदेत 'आणीबाणीतील काळे दिवस' या विषयावर व्याख्यान होते. व्याख्यानाला तुडुंब गर्दी होती. श्रोत्यात भावे अगदी पहिल्याच रांगेत उपस्थित होते. व्याख्यान संपल्यावर भावे यांनी माझ्या भावाला-'तुम्ही अमेरिकेत परत जाण्यापूर्वी एकदा भेटू, बोलू', असे आवर्जून सांगितले. भावे नंतर डोंबिवलीला जाणार होते. पुन्हा आलो की भेटू असे मोघम बोलणे झाले.

माझ्या भावाचा अमेरिकेला परतायचा दिवस अगदी जवळ आलेला होता. एके दिवशी सायंकाळी आम्ही दोघे लक्ष्मीरोडवरच्या एका दुकानात खरेदी करीत होतो. भावाला आठवण झाली. तो म्हणाला-'फक्त पु. भा. भाव्यांना पुन्हा भेटायचे राहिले. आता मला ते शक्य दिसत नव्हते.'

पण काय आश्चर्य! आम्ही दोघे दुकानाच्या पायऱ्या उतरतो, तो दुकानाला लागून फूटपाथवर लहान मुलांची खेळणी घेऊन जो फेरीवाला उभा होता, त्याच्यासमोर भावे उभे! ते लहान मुलांची खेळणी हाताळीत होते. त्यात रंगून गेले होते. हातात खेळणे घेऊन हे लहान मूल कसे हाताळील, कसे खिदळेल, याचा अंदाज घेत होते.

अशी अचानक गाठ पडली. भावे यांचा सायंकाळचा फेरफटका चालू होता. त्यांना काम असे नव्हते. आम्ही तिथे लक्ष्मीरोडवरल्या उंबऱ्या गणपतिचौकातल्या बारमध्ये गेलो. समोर मद्य आले. गप्पा सुरू झाल्या. भावे अमेरिकेतल्या जीवनासंबंधी, तिथली माणसं, निसर्ग, राजकारण या सर्वांविषयी सतत औत्सुक्यानं काही ना काही विचारत होते. बोलायच्या ओघात मी भावे यांना म्हटलं-

'भावे, तुमच्यासारख्या लेखकानं तरी परदेश पाहून यायला नको का?'

'हवा, पाहायला हवा; पण आम्हाला कोण पाठवणार? आम्ही सरकारच्या 'गुड बुक्स' मधले साहित्यिक नाही! मी ब्लॅक लिस्टेड आहे!'

हे बोलताना भाव्यांचा चेहरा मला आजही आठवतो. सरकारी कृपा नाही याची रुखरुख त्यावर नव्हती. दीनवाणेपणा नव्हता. खिन्नता नव्हती. काहीसा अभिमानच होता. ते पुढे म्हणालेच-

'सावरकर पत्करले तेव्हाच हे सगळं ठरलं!'

भावे हे उत्तम गृहस्थी होते. त्यांच्या पुणे येथील निवासात मी तीन-चार वेळा गेलो होतो. आपल्या पद्मिनी या नाटकावर त्यांचा फार जीव होता. त्यांनी मला भेट दिलेल्या प्रतीवर तारीख आहे ३-७-७७. त्यांच्या भेटीची आठवणारी ही एकच तारीख. आलेल्या माणसाचे बेहिशेबी स्वागत त्यांचे होते. भावे पुन्हा पुन्हा आठवण द्यायचे-'आपण पुन्हा त्या डाकबंगल्यात केव्हा जायचे?' मी पंडित कुळकर्णींना निरोप द्यायचो-'केव्हा गाडी काढता? भाव्यांना पुन्हा न्यायचं आहे!' पण तो योग पुन्हा आला नाहीच, आता येण्याची शक्यताच नाही!'

नागपूरचा पसारा आवरून भावे यांनी नागपूर सोडले. योगायोग असा की, ज्या दिवशी भावे याना निरोप देण्याचा समारंभ नागपूरकरांनी आयोजित केला होता, त्या दिवशी मी नेमका नागपुरात होतो. भाव्यांचा मित्रपरिवार खूप. २५०-३०० मित्रमंडळींनी सभागृह खेचाखेच भरले होते. भाव्यांवरचे प्रेम प्रत्येक वक्त्याच्या भाषणातून ओसंडत होते.

भावे विदर्भातले; पण हे मुद्दाम लक्षात आणून दिले तरच कळायचे. नागपूरकडला साहित्यिक म्हटला की, विवक्षित चित्र डोळ्यांसमोर येते. काही आढ्यता-Holier than thou-असा पवित्रा-वगैरे. भावे याला अपवाद होते. खास विदर्भी असे ते वाटायचेच नाहीत.

सत्तरी गाठलेली होती. विकलांग स्थितीत जगत राहणे ही भाव्यांसारख्या वादळी वृत्तीच्या साहित्यकाराला शिक्षाच झाली असती. भावे आता नाहीत. साहित्यातला उच्चतम मान त्यांना लाभत असताना, राजकीय पक्षाचीच कडवी जात करणाऱ्यानी त्यांचा अपमान केला नसता तर फार बरे झाले असते ही समज आपल्याकडे इतकी दुर्मिळ असावी याची खंत वाटते. भावे याचा अखेरचा लेख हा बहुधा त्यांनी काणेकरावर लिहिलेल्या म. टाइम्स-मधील मृत्युलेख असावा. त्यात त्यांनी लिहिले होते-

'काणेकराचे मरण आम्ही पाहिले तेव्हाच आमचेही मरण आम्ही पाहिले!'

कै. पु. भा. भावे यांच्यासंबंधात हाच विचार त्यांच्या लेखनावर आणि व्यक्तित्वावर प्रेम करणाऱ्याच्या मनात आज येणे अपरिहार्य आहे

□

अबोल कर्तृत्व

# कै. दि. वि. काळे

श्री. दि. वि. तथा बापूसाहेब काळे हे नाव सर्वसामान्य मराठी वाचकांना अपरिचित असले तरी जाणत्या, विशेषतः इतिहास-प्रेमी वाचकांना ते चांगले परिचित आहे. त्यातून अशी व्यक्ती संशोधक असेल आणि जगाकडे पाठ फिरवून आपल्याच कार्यात सतत मग्न असेल तर त्या व्यक्तीच्या वाट्याला प्रसिद्धी, लोकप्रियता साहजिकच अल्पप्रमाणात येते. बापूसाहेब काळे तर आपल्या अंगीकृत कार्यात सदैव इतके गढलेले असत की सभा-संमेलने, गाठीभेटी, गप्पाटप्पा इत्यादी उद्योग करण्यास त्यांना कधी सवडच मिळाली नाही. प्रसिद्धीपासून ते कटाक्षाने दूर राहत. 'मी, माझे संशोधन, संपादन, लेखन आणि या कार्याशी निगडित असणारे तेवढेच सार्वजनिक कार्य–' यात ते पूर्ण समाधानी होते. केल्या कार्याविषयी तृप्त होते. स्वतःसाठी त्यांनी कधी कुणाजवळ काही मागितले नाही. कुणाविषयी तक्रार केली नाही. स्वावलंबन, सततोद्योग, चिकाटी, शिस्त, स्वाभिमान आणि सत्यज्ञानविषयी पराकाष्ठेची जागृतता, असे गुण त्यांचे ठायी उत्कटत्वाने वसत होते. अंगीकृत कार्याशिवाय त्यांनी एक क्षणही वाया घालविला नाही. आजचे काम कधी दुसऱ्यावर अथवा उद्यावर ढकलले नाही. बापूसाहेब काळे सदैव घाईत असत. कामासाठी म्हणून जरी कुणाकडे गेले तरी संकोचाने जात व कामापुरते बोलून पुन्हा जलदगतीने आपल्या कामाला लागत. केवढा अबोल कर्तृत्वाचा हा ध्येयवादी माणूस होता!

पु. भा. भावे गेले त्याच दिवशी सकाळी बापूसाहेब टिळकवाडीतील आपल्या निवासस्थानी शांतपणे गेले. घरी या वेळी फक्त पत्नी. एकुलता एक पुत्र बंगलोरला लष्करी-सेवेत. दि. वि. गोखले आणि देशपांडे हे दोघे जामात आणि त्यांची कुटुंबीय मंडळी मुंबईला. तिसरे जामात कै. ओगले हे नागपूरचे देशभक्त पत्रकार गोपाळराव ओगले यांचे चिरंजीव. ब्याऐंशी वर्षांचे बापूसाहेब मृत्यूचे दिवशी 'सूचिमंडळा'च्या एका बैठकीकरता साहित्य-परिषदेत दुपारी येणार होते; पण दोन-तीन दिवस आधी त्यांची प्रकृति बिघडली आणि एकदा तोल जाऊन ते घरी पडलेसुद्धा! कै. भावे यांची वार्ता ऐकून मी परिषदेत सकाळी जातो तो तिथे बापूंचे दीर्घ सहप्रवासी शं. ना. बर्वे आणि प्रा. ग. बा. सरदार उपस्थित. त्यांच्या तोंडून बापूंच्या निधनाची वार्ता ऐकून मला धक्काच बसला. ऊर क्षण-दोन क्षण भरून आलं. गड्याला सांगून लगेच हार आणला आणि सरदारांच्या पाठोपाठ बापूसाहेबांच्या निवासी जाऊन त्यांना आदरपूर्वक तो अर्पण केला. आदर वाटावा, विद्वत्तेचा धाक वाटावा अशी माणसं एकामागून एक या उथळ अक्षर-सृष्टीतून जात आहेत. ज्यांचं लेखन, विधान, शब्द प्रमाण मानावा आणि ज्यांचं चारित्र्य, कार्यक्षमता पाहून नतमस्तक व्हावं अशी माणसं अदृश्य होऊ लागली की, 'भरून न येणारी पोकळी' खऱ्या अर्थानं जाणवू लागते. बापूसाहेबांच्या मृत देहावर किती हार पडले, त्यांच्या रात्रीच्या अंत्ययात्रेला किती गर्दी याला सुतराम महत्त्व नाही.

इतिहासाचार्य राजवाडे, देशभक्त विजापूरकर, दत्तोपंत आपटे यांच्या देहावर तरी किती हार पडले? बापूसाहेबांचे हे तिघे आदर्श होते. या तिघांच्या कार्यापासूनच स्फूर्ति घेऊन त्यांनी आपल्या जीवनाची दिशा ठरविली होती. मुंबईच्या विल्सनमध्ये शिकत असता कै. श्रीपादराव नवरे आणि श्री. मोरारजी देसाई बापूंचे सहाध्यायी होते. तीन वर्षांपूर्वी मोरारजी साहित्यपरिषदेत आले असता बापू हजर होते; पण त्यांनी मोरारजींना आपली ओळख करून दिली नाही, तर प्रो. दे. द. वाडेकरांनी त्यांना या जुन्या ओळखीची आठवण करून दिली. प्रथम श्रेणीत एम. ए. झालेले बापूसाहेब तळेगावच्या राष्ट्रीय शिक्षण शाळेत शिक्षक म्हणून रुजू झाले तेव्हाच या माणसाचे आयुष्य कसे जाणार हे ठरून गेले. नऊ-दहा वर्षे सचोटीने तिथे काढल्यावर बापू काही काळ पुण्यात टिळक विद्यापीठात व स. प. महाविद्यालयात होते यानंतर १९३५–३६ च्या सुमारास कै. तात्यासाहेब केळकरांनी त्यांचे गुण हेरून त्यांना 'केसरी मराठा संस्थे'त दाखल करून घेतले. बापू ह्या वातावरणात सहजगत्या रमले आणि ग्रंथपाल, 'सह्याद्री' मासिकाचे कार्यकारी संपादक, पुढे संपादक या नात्याने त्यांनी उत्कृष्ट प्रशासकीय आणि संपादकीय कार्य केले. त्यांच्या चौफेर, सूक्ष्म आणि सदभिरुचि-संपन्न संपादकीय दृष्टीमुळे 'सह्याद्री' मासिकाला आता एक प्रकारचे संदर्भमूल्य आलेले आहे.

इतिहास, वाङ्मय आणि शिक्षण ही बापूसाहेबांची आवडीची व व्यासंगाची क्षेत्रं होती. रायगड स्मारक मंडळ, शिवचरित्र संशोधन कार्यालय, ग्रंथालय चळवळ, दत्तोपंत आपटे स्मारक मंडळ, केळकर मंडळ आणि भा. इ. सं. मंडळ या पाच संस्थांत आखीवरेखीव पद्धतीने त्यांनी जे निरलस विधायक कार्य केलं ते पायाभरणीचं होतं असं म्हटल तर अतिशयोक्ती ठरू नये. बापू काही वर्षे पुणे विद्यापीठाच्या कोर्टाचे आणि साहित्यपरिषदेच्या कार्यकारिणीचे क्रियाशील सभासद होते, सार्वजनिक स्वरूपाची ही कामं करताकरता त्यांचं संशोधन–लेखन कधीही थांबलं नाही. वरील सार्वजनिक संस्था या खरं म्हणजे त्यांच्या ज्ञानार्जनाची साधनं होती. त्यामुळं कुठल्याही पदाला चिकटून न राहता, काम संपलं किंवा होईनासं झालं की, ते आपणहून दूर होत पेलेल आणि जमेल तेच हाती घ्यायचे हा त्यांचा बाणा असल्यामुळे, हाती घेतलेलं प्रत्येक कार्य त्यांनी तडीस नेलं आणि जाणकारांची पावती घेतली.

कै. बापूसाहेबांनी ऐतिहासिक टिपणं, लेख, निबंध पुष्कळ लिहिले; पण ग्रंथ असा एकच लिहिला आणि तो म्हणजे 'छत्रपती शिवाजीमहाराज' हा पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेला. या स्वस्त ऐतिहासिक चरित्रग्रंथाच्या १९६० ते ७१ या अवधीत तीन आवृत्त्या निघाल्या आणि अकरा हजार प्रती खपल्या. शिल्लक थोड्याच असतील. मराठीतील सर्वोत्कृष्ट प्रमाणभूत शिवचरित्र या दृष्टीने हा ग्रंथ मौलिक आहे. साधार अचूक माहिती आणि तटस्थरीतीने केलेला सर्वांगाने पण आटोपशीर विस्तार हे या चरित्राचं ठळक वैशिष्ट्य आहे. या ग्रंथास लालित्याची जोड मिळती तर, पुरंदऱ्यांच्या

शिवचरित्राप्रमाणे तो महाराष्ट्राच्या घराघरात वाचला जाता; पण लालित्य, रसाळपणा, रंजकता या गोष्टी बापूसाहेबांना इतिहासलेखनात तरी मंजूर नव्हत्या. आणि खरं सांगायचं तर त्यांचा स्वभावच एकूण गंभीर, करडा, विशिष्ट शिस्तीत वाढलेला होता. अघळपघळ, दिशाहीन, निराधार लिहिणे-बोलणे त्यांना मानवतच नसे. शिवचरित्राच्या राष्ट्रीय उद्योगातून बाहेर पडल्यावर सत्तरीत त्यांच्याकडे ग्रंथसूचिकार दाते यांचं अपूर्णावस्थेत राहिलेलं कार्य चालून आलं. 'मराठी नियतकालिकांच्या सूची' चं संकलन-संपादनकार्य आज चार-पाच खंडाच्या रूपाने समस्त अभ्यासकासमोर आहे. ते पाहून मन थक्क होतं. कै. काळे आणि त्यांच्याच तालमीत तयार झालेले शं. ना. बर्वे याच्या मुख्यत: चिकाटीचं आणि भगीरथ प्रयत्नाचं हे कार्य म्हणजे मराठी भाषेचं भूषण आहे. अशा कार्याचं मोजमाप करण्यास दुर्दैवाने आज कुठलेही निकष वा मानदंड नाहीत. काळे-बर्वे याचं जणू हे अवतारकार्यच ! कै. काळे यांच्या साक्षेपी ग्रंथसंपादणीचा आणखी एक छोटा नमुना म्हणजे राजवाड्यांच्या एकूण लेखनाचं नवनीत शोभेल असं त्यांचं 'राजवाडेदर्शन' नामक पुस्तक. (अ वि. गृह प्रकाशन) साधी राहणी, राष्ट्रीय मनोवृत्ती, कार्यनिष्ठा, प्रसिद्धिविन्मुखता आणि मताग्रही असूनही परमतसहिष्णुता हे कै.बापूसाहेब काळेंचे गिरविण्याजोगे गुण आहेत. ९ एप्रिल १९७७ रोजी आम्ही काही हितचिंतकानी थोडी रक्कम गोळा करून बापूसाहेबांचा मंडळात प्रकट सत्कार केला होता. त्या वेळी त्यांची संमती मिळवताना किती श्रमसायास पडले ! प्रो. वाडेकरांसारखा मोहरा इरेला घातला तेव्हा कुठे ती मिळाली !

कै. दि. वि. काळे यांच्यासारखी ज्ञानप्रखर माणसं आता विरळी ! सूचीखंडाच्या इमारतीवर कळस चढवण्याचा योग दृष्टिपथात आला असता हा रचयिताच कालोदरात गडप व्हावा यापरतं दुर्दैव ते कोणतं ?

—म. श्री. दीक्षित

# वारसाची निवड

## राजीवचा राजकारणप्रवेश

वा. दा. रानडे

संजय गांधीच्या अपघाती निधनानंतर त्याची जागा कोण घेणार याबद्दलची अनिश्चितता आता जवळजवळ संपली असून ती भूमिका पार पाडण्यासाठी पंतप्रधान श्रीमती गांधींनी राजीव गांधीचे मन वळविले आहे. 'माझ्या राजकरणप्रवेशाने आईला मदत होणार असेल तर मी प्रवेश करीन ;' असे राजीव गांधीनी 'न्यू दिल्ली' या पत्रास दिलेल्या मुलाखतीत सांगितले. याबद्दलचा औपचारिक निर्णय ते येत्या काही आठवड्यात जाहीर करतील.

उत्तर प्रदेशात काही लोकसभाजागाच्या पोटनिवडणुका व्हावयाच्या आहेत. त्यांपैकी एका जागेसाठी त्यांची निवड होईल. संजय गांधींच्या अमेठी मतदारसंघातून ते उभे राहतील असे दिसत नाही. राजीवच्या समर्थकांना तो मतदारसंघ नको आहे. अमेठीमध्ये संजय गांधी पहिल्यांदा पराभूत झाले. दुसऱ्यादा निवडून आले तरी थोड्या दिवसांतच त्यांचे अपघाती निधन झाले. तेव्हा आपली राजकीय कारकीर्द राजीव गांधींनी या दुर्दैवी मतदार संघातून सुरू करू नये असे त्यांना वाटते. काहीशा भावनात्मक दृष्टिकोनातून ते या प्रश्नाकडे पहात आहेत. संजयचे स्थान हवे; पण संजयच्या लोकप्रियतेमुळे, त्यांच्या प्रभावामुळे आपल्याला हे स्थान मिळाले अशी स्वत.बद्दलची प्रतिमा राजीवना निर्माण होऊ द्यावयाची नाही. स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्यांना प्रस्थापित करावयाचा आहे.

अमेठीमधून मेनका गांधी उभ्या राहण्याची शक्यता आहे. वारसाच्या स्पर्धेत आज त्या मागे पडल्यासारख्या दिसत असल्या तरी त्यांनी लढत सोडलेली नाही आणि संधी आपल्या हातून पूर्णपणे निसटली आहे असेही त्यांना वाटत नाही, इंदिरा गांधींसारख्याच त्या महत्त्वाकांक्षी व सत्ताकांक्षी आहेत. आज देशाला संजयसारख्याच नेतृत्वाची गरज आहे. राजीवमध्ये हे गुण नसल्याने ते ही जागा भरून काढू शकणार नाहीत. संजयची तडफ मेनकामध्ये आहे असे युवक कॉंग्रेसमधल्या एका गटाला वाटते व त्यांच्या बाजूने या गटाच्या हालचाली चालू आहेत.

मुख्य प्रश्न आहे राजकीय वारसाचा निर्णय कशा पद्धतीने व कोणी घ्यावयाचा ? याबाबत निरनिराळी मते मांडली जातात. प्रभावी नेत्याच्या निधनानंतर नेतृत्वाची पोकळी निर्माण होता कामा नये. त्याची जागा घेणारा दुसरा समर्थ नेता तयार हवा हे तर खरेच. पंडित नेहरूंच्या काळात 'नेहरूनंतर कोण ?' असा प्रश्न चर्चिला जात होता आणि नेहरूंनी आपल्या मागे देशाची सूत्रे समर्थपणे पेलणारा वारस निर्माण केला नाही अशी टीका त्यांच्यावर होत होती. नेता घडविण्याची आवश्यकता नेहरूंना वाटत नव्हती. परिस्थितीतून नेतृत्व उदयास येईल असा त्याचा विश्वास होता. दुसरे असे की आपल्या मागे आपल्या घराण्याकडेच सत्ता रहावी यासाठी इंदिरा गांधी जसा जाणीवपूर्वक प्रयत्न करताना दिसतात तशी नेहरूंची भूमिका नव्हती. आपल्या हयातीत त्यांनी इंदिरा गांधींना सत्तेपासून दूरच ठेवले होते. त्या एक वर्ष कॉंग्रेसच्या अध्यक्ष होत्या; पण त्यापलीकडे महत्त्वाचे निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांनी इंदिरा गांधींना सहभागी केले नव्हते. संजय जसा इंदिरा गांधींचा सल्लागार तशा इंदिरा गांधी नेहरूंच्या सल्लागार नव्हत्या. सरकारी कारभार आणि पक्षसंघटना यात संजयचा हस्तक्षेप होत होता, त्यांच्या नापसंतीची माणसे बदलली जात होती, पसंतीची घेतली जात होती. नेहरूंनी इंदिरा गांधींना असा हस्तक्षेप करू दिला नाही.

नेहरूंचे हे धोरण योग्य असले तरी राजकीय वारस तयार करण्यासंबंधात त्यांची भूमिका पूर्णपणे बरोबर होती असे म्हणता येणार नाही. विशिष्ट व्यक्ती हेरून तिलाच त्यांनी नेतेपदासाठी तयार करायला हवे होते असे नाही; पण कॉंग्रेस पक्षातील नेतृत्वाचा एकूण दर्जा वाढेल आणि देशापुढील निर-

निराळी आव्हाने पेलण्यास समर्थ नेते निर्माण होतील अशी योजना आखायला हवी होती. या कार्याकडे दुर्लक्ष झाले. कांग्रेस-पक्षबांधणीत हा एक महत्त्वाचा कच्चा दुवा राहिला. आजच्या पेचप्रसंगाचे मूळ त्यात आहे. अलौकिक नेतृत्वगुण असलेल्या व्यक्तीकडे देशाचे नेतृत्व स्वाभाविकपणेच येते; पण दुसऱ्या फळीच्या नेतृत्वाचे पाठबळ तिच्यामागे नसेल तर केवळ स्वतःच्या बळावर देशापुढील प्रश्न ती यशस्वीपणे सोडवू शकत नाही. दुसऱ्या फळीच्या नेत्याची उणीव केवळ कॉंग्रेस पक्षातच आहे असे नाही. इतर पक्षांमध्येही ती जाणवते. जनता पक्षात वृद्ध नेत्यांतील भांडणामुळे पेचप्रसंग निर्माण झाला तेव्हा त्यांना बाजूला सारून पक्षाचे नेतृत्व करण्यात दुसऱ्या फळीचे नेतृत्व कमी पडले.

आज इंदिरा कॉंग्रेस पक्षाची परिस्थिती अशी आहे की, एक इंदिरा गांधी सोडल्या तर बाकी नेते त्यांच्या तुलनेने फार कमी उंचीचे व वकूबाचे आहेत. नेतृत्वात आपल्याला प्रतिस्पर्धी निर्माण होऊ द्यावयाचा नाही, कोणाही नेत्याला फार वाढू द्यावयाचे नाही असे धोरण इंदिरा गांधींनी पद्धतशीरपणे अवलंबिले. यशवंतराव चव्हाणांच्या बाबतीत हे अनुभवास आलेलेच आहे. मंत्रिमंडळातल्या किंवा पक्षातल्या आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांपेक्षा संजय त्यांना जवळचा वाटला. त्यालाच त्यांनी आपला राजकीय वारस निवडून पुढे आणले आणि त्याच्या अकाली निधनानंतर आता राजीवला त्या पुढे आणीत आहेत. मंत्री, खासदार आता राजीवच्या गाठी-भेटी घेऊ लागले आहेत.

देशाचे नेतृत्व करण्यात आपल्या घराण्यापलीकडे लायक नेताच इंदिरा गांधींना दिसत नाही आणि त्यांचे मत मनातून पटत नसले तरी त्याला उघड विरोध करण्याचे धैर्य आज इंदिरा कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये कोणापाशीही नाही हा सध्या घडत असलेल्या घटनांचा अर्थ आहे. लाचारीच्या राजकारणाने कळस गाठला आहे.

राजीव गांधी राजकारणात प्रवेश करीत आहेत ते त्यांच्याच शब्दात सांगावयाचे तर आईला मदत करण्यासाठी. देशाचे व्यापक हित त्यातून साधेल का हाही विचार आहे. राजीव यांनी युवक कॉंग्रेसचे नेतृत्व करावे अशी मागणी देशाच्या निरनिराळ्या भागांतून होत आहे, ती कशी अमान्य करता येईल? या विचाराने राजकारणप्रवेशास ते अनुकूलता दर्शवीत आहेत. आईला मदत कोणत्या प्रकारे करणार असा प्रश्न त्यांना विचारला असता राजीव म्हणाले, 'लोकांना काय वाटते, त्यांचे प्रश्न काय आहेत' याची माहिती इंदिराजींना पोचविणे ही माझी भूमिका राहील. अनेक लोकांना इंदिराजींना भेटण्याची इच्छा असते; पण वेळेअभावी त्या सर्वांना भेटू शकत नाहीत. याबाबतीत मी मदत करू शकेन.'

राजीव यांच्या उद्गारांवरून स्वतःकडे सध्या तरी अत्यंत मर्यादित भूमिका ते घेऊ इच्छितात. लोक आणि इंदिराजी यांच्यातील दुवा म्हणून ते काम करणार आहेत; पण सुरुवातीला ही मर्यादित भूमिका असली तरी येत्या पाच वर्षांत म्हणजे पुढच्या निवडणुकीपर्यंत त्यांना आपला वारस म्हणून तयार करावे या दृष्टीने इंदिरा गांधी त्यांच्यावर हळूहळू वाढत्या जबाबदाऱ्या टाकण्याची शक्यता आहे. संजयसारखा राजीव आग्रही नाही त्यामुळे त्यांच्याबरोबर काम करणे इंदिरा गांधींना अधिक सोपे जाईल; पण लोकसभेतील आणि इंदिरा कॉंग्रेसमधील संजयगटाच्या युवकांचे राजीवच्या सौम्यनेतृत्वाने कितपत समाधान होईल याची शंका वाटते. □


## – नवीन दाखल झालेली पुस्तके –


| | | |
|---|---|---|
| १. | अनुष्टुभ कथा ७९–संपादक–प्रा. रमेश वरखेडकर, प्रा. पुरुषोत्तम् पाटोल, प्रा. भा. ज. कविमंडन, वा. रा. सोनार | रुपये १८/– |
| २. | शापित ( दुष्काळ विषयावरील कादंबरी ) अरुण साधू | १५/– |
| ३. | घर–दार ( कादंबरी ) मधु सावंत | १८/– |
| ४. | स्वर ( कथासंग्रह ) व. पु काळे | २५/– |
| ५. | महाकवी कालिदासाचे मेघदूत ( समश्लोक, समवृत्त, सयमक मराठी अनुवाद ) चिं. द्वा. देशमुख | १२/– |
| ६. | माणसं ! ( लेखसंग्रह ) अनिल अवचट | २७.५० |
| ७. | रोमिओ ( कादंबरी ) गुलशन नन्दा | २५/– |

**— ENGLISH —**

| | | |
|---|---|---|
| 1. | **Gossip**— ( Poisionous Pen is big business in journalism ) Marc Olden | Rs £ 1.25 |
| 2. | **The Shipkiller**— ( Greatest novel of the sea since Moby Dick ) Lusline Scott | £ 1.25 |
| 3. | **To The Lighthouse**— ( Classic-Novel )- Virginia Woolf | 95p. |

* *Which is the loveliest book ?*
Not a Bank Pass-Book, Mind !
But a ' Phoenix ' Book ! !

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**



# कशाला हवा ही पंढरपूरची वारी ?

## एक व्यावहारिक विचार !

डॉ. शरद अभ्यंकर, वाई

अशी कल्पना करा की टपालव्यवस्था, तारा, टेलिफोन, रेडिओ, टी. व्ही. दळणवळण, उपग्रह इ. कसलीच व्यवस्था नसणारा एक विस्तीर्ण प्रदेश आहे. प्रत्यक्ष पाठवलेला जासूद किंवा येणारे-जाणारे प्रवासी एवढाच संपर्काचा मार्ग. हा प्रवास करण्यासाठी रेल्वे, मोटारी, विमाने इ. उपलब्ध नसून जास्तीत जास्त वेगाने जाणारे वाहन म्हणजे घोडा. अशा परिस्थितीत सर्व समाजामध्ये सुसंवाद, दळणवळण, एकोपा, विचारमंथन हे व्हावे म्हणून तुम्ही काय कराल ? तर एका विशिष्ट दिवशी, एका विशिष्ट ठिकाणी जास्तीत जास्त लोकांनी एकत्र यावे असा नियम कराल; पण असा नियम तरी लोक पाळतील कसा ? मग त्याला पापविनाश, पुण्यकर्म, पवित्र देवतांचा निवास अशी काही धार्मिक जोड द्याल. होय ना ? नेमकी हीच गोष्ट आमच्या पूर्वजांनी केली आणि त्यातूनच कुंभमेळे, निरनिराळ्या देवतांचे उत्सव आणि तीर्थस्थानांच्या ठराविक दिवशी भरणाऱ्या यात्रा सुरू झाल्या. प्रवास खडतर असल्यामुळे आणि एकूण लोकसंख्याच कमी असल्यामुळे या ठिकाणीही फारशी गर्दी होत नसे आणि समाजातील अभिसरणाचा प्रश्न सोडविण्यापुरती ती पुरेशी असे. एकमेकांच्या प्रदेशातील वृत्त, अडचणी, उपाय इ. विचारांची देवाणघेवाण हा या मेळाव्यांच्या मागचा प्रधान हेतू असे तो साध्य होई.

आता अशी कल्पना करा की तुम्हाला एका मित्राने जेवायला बोलावले आहे आणि तो आणि त्याची पत्नी लाकडावर लाकूड

घासून अग्नी निर्माण करायचा अर्धा तास प्रयत्न करताहेत! त्यांना तुम्ही काय म्हणाल? नेमकी तीच विशेषणे अजूनही मेंढरासारखे लाखाच्या समुदायाने पंढरपूर, नाशिक आणि प्रयाग इथे जमणाऱ्या यात्रेकरूंना तुम्ही लावायला हरकत नाही.

आता दळणवळणाची साधने सख्येने आणि वेगाने खूपच वाढली आहेत. रस्तें सुधारले आहेत. चोऱ्या – माऱ्या होण्याची भीति नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या वा कर्नाटकाच्याही कोपऱ्यातला माणूससुद्धा अल्पखर्चात २४ तासात पंढरपूरला पोचू शकतो आता वर्षभर केलेली पापे इतक्या स्वस्तात जर चद्रभागेच्या एका बुचकळीत नाहीशी होणार असतील (म्हणजे तशी बालपणापासून तुमची समजूत करून दिलेली असेल) तर लक्षावधी लोक तिथे धावतील यात नवल ते काय? बरे, अशा रीतीने पापनाश वगैरे काही होत नाही, तेव्हा जनहो, तुम्ही असाल तिथेच परमेश्वराचे स्मरण केलेत तरी चालेल, निव्वळ आपले कर्तव्य योग्य रीतीने बजावलेत, दीनदुबळ्याना मदत केलीत, पापाच्या पैशाला हात लावला नाहीत, तर तीच ईश्वराची उत्तम सेवा होय, असे लोकाना कोणी शिकवतील म्हणता काय? नाव कशाला? अहो, हे ज्यांनी शिकवायचे ते समाजधुरीण, धर्माधिकारी, कीर्तन–प्रवचनकार, फार काय वृत्तपत्रे देखील या मेळाव्याचे आणि तिथे जमलेल्या भक्तगणाचे अफाट गुणवर्णन करण्यात एवढे दंग असतात की, एकादशीला पढरपूरला न जाणे हेच फार मोठे पाप आहे असे सर्वसाधारण माणसाला वाटावे. शिवाय माझ्यासारखा कुणी या प्रकारातला फोलपणा दाखवू लागला तर लगेच 'बुद्धिवादी दिसतो आहे लेकाचा! या पामरांना काय कळणार या भक्तिसागराचे रहस्य?' अशा शब्दात त्याची कीव केली जाते आणि या ठिकाणी जमणाऱ्या लोकाची संख्या हेच या यात्रेच्या यशाचे मोजमाप समजून ऑलिम्पिक विक्रमासारखे दरवर्षी याचे वाढते आकडे सहर्ष जाहीर केले जातात.

खरी गोष्ट अशी आहे की, थोड्या दिवसाकरता येणाऱ्या या प्रचंड लोकसंख्येला तोंड द्यायला या गावाचे बिलकूल सामर्थ्य नसते. त्यामुळे इथली रेल्वे, एस्. टी., पिण्याचे पाणी, सांडपाणी, मैला–निचरा, स्वच्छता, आरोग्य, रस्ते, सुरक्षाव्यवस्था, या सर्वांवर जबरदस्त ताण पडतो. एखाद्या युद्धाच्या छावणीची व्यवस्थाही इतकी अवघड नसेल. नगरपालिका, राज्यशासन, रेल्वे या सर्वांना जादा अधिकारी नेमून, अनेक उपाय योजून, अपार कष्ट घेऊन हा सोहळा पार पाडावा लागतो. या सर्व अधिकारी मंडळींचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. या सर्वांना मिळणारा युद्धसमान परिस्थितीला तोंड देण्याचा अनुभव हाच या सर्व यात्रेचा अल्पसा फायदा म्हणता येईल.

पूर्वी अशा ठिकाणी उद्भवणाऱ्या साथीच्या रोगामुळे शेकडो भक्ताना इथे आपली इहलोकीची यात्राच संपवावी लागत असे. त्याच्या नातेवाइकांना उगीच वाईट वाटू नये म्हणून असा माणूस थेट वैकुंठात जातो वगैरे भूलथापा मारल्या जात. आता लस टोचल्यामुळे आणि आरोग्य दक्षतानियम पाळल्यामुळे ही संख्या रोडावली; पण सगळे यात्रेकरू मुकाट लस टोचून घेतात असे वाटले काय तुम्हाला? परवा एक म्हातारा सागत होता, 'मी इतक्या वेळा पढरीला गेलो आहे, पण अजून एकदाही टोचून घेतलेले नाही. अहो पाच रुपये दिले की बक्कळ टोचल्याचे दाखले मिळतात.' दर्शनासाठी असेच पैसे वा वशिला चालतो हे सर्वांनाच ठाऊक आहे. 'असा खोटेपणा करून दर्शन घेतल्याचे पुण्य देव तुम्हाला कसा देणार?' असे मी विचारताच तो मनापासून हसला आणि म्हणाला–'कशाचं पुण्य आणि कशाचं पाप! आपल मनाला ग्वाड वाटतं म्हणून जायाचं!' आणि हे 'मनाला ग्वाड' कां वाटतं तर लहानपणापासून मनावर झालेलं हॅमरिंग!!

बरं अशा वर्षानुवर्षे वारी करण्यामुळे या वारकऱ्याच्या मनोवृत्तीत काही फरक पडतो का? नाव काढू नका. 'जे जे भेटेल भूत, ते ते मानिजे भगवंत.' हे ध्येयवाक्य मिरवणाऱ्या या दिंडीवाल्यानी काही वर्षांपूर्वी अस्पृश्याच्या दिंड्या सवर्णांच्या दिंड्यापासून अलग ठेवायच्या या हट्टापायी, जे प्रकार केले होते, ते पाहिल्यावर कुणाही सज्जन माणसाला तिडीक आली असती.

इतके करून त्या पांडुरंगाचं दर्शन सर्व यात्रेकरूंना होतच नाही!' आता कायदा झाला म्हणून, नाही तर या दर्शनाबरोबर तिथल्या बडव्याकडून शिव्याची 'भ'ची बाराखडी ऐकून, धक्काबुक्की सोसून, वर भरमसाठ दक्षिणा टाकण्याची शिक्षाही सोसावी लागे. हे बडवे केवळ भक्तांनाच शिव्या देतात असे समजू नका. साक्षात विठ्ठलासमोर हे एकमेकानाही आईवरून शिव्या घालतात. माझी खात्री आहे, एखाद्या वर्षी पाऊस कमी पडल्यामुळे यात्रा रोडावते त्या वेळी हे बडवे खुद्द विठ्ठलालादेखील कचकावून शिव्या घालत असतील!

## वाया जाणारे मॅनअवर्स

आता या वारीपायी वाया जाणारे 'मॅनअवर्स' वगैरे मोजायचे म्हणजे पुन्हा पाखंडीपणाचा आरोप ओढवून घ्यायचा. मला वाटते की प्रा. दि. धों. कर्वेच एकदा म्हणाले होते की, ज्या दिवशी आपला उद्योग–व्यवसाय सोडून हे लोक उगाच पंढरीची वारी करायची बंद करतील त्या दिवशी भारताची खरी प्रगती झाली असे मी समजेन. तेव्हा थोडा हिशोब खरोखर करूनच बघू. या वर्षी यात्रा ५ लाख झाली. प्रत्येकाचे सर्वसाधारण ६ दिवस या यात्रेत मोडले असे धरले तर रोजचे कामाचे ८ तास याप्रमाणे ६×८=४८×५ लाख इतके मॅन अवर्स बुडाले म्हणजे. आमचे धोमधरण बांधायला पुरले तेवढे 'मॅन अवर्स! दरवर्षी!! माय गॉड!!!' कोण म्हणतो आमचा देश दरिद्री आहे! इतके मॅनअवर्स वाया घालवण्याची चैन जगातील कुठल्याही राष्ट्राला आज परवडते आहे का? हीच आमची आध्यात्मिक श्रीमंती! नुसते डॉलर्स काय अमेरिकन लोक देखील मिळवतात!

या मेळाव्यात सामील होऊन महाराष्ट्राचे मंत्री या दैवताची थाटामाटाने पूजा करतात (तोपर्यंत बिचारे वारकरी रांगेत ताटकळत उभे असतात) हा या यात्रेतला आणखी एक अपप्रकार. फुकट मानमरातब आणि प्रसिद्धी मिळवणे हाच या मागचा एकमेव हेतू. अन्यथा घरी कधी वर्षानुवर्षात देवाची पूजा न करणारे महाभाग, मंत्री होताच इथल्या पूजेला अहमहमिकेने धावतात आणि पूजा करताना मागे कॅमेऱ्याकडे वळून दात विचकून हसत असतात याचा दुसरा अर्थ काय?

या दैवतापेक्षाही जास्त भारी देव आहे

आंध्रमधील तिरुपती बालाजी; पण या देवाचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण झाले. त्यामुळे इथे जमा होणाऱ्या प्रचंड पैशातून या देवस्थानाने अनेक लोकोपयोगी आणि सामाजिक सुधारणांचे कार्यक्रम राबवले आहेत. त्यात शाळा, कॉलेजेस, संस्कृत पाठशाळा, मूकबधिर विद्यालय, अनाथालये, संगीत–नृत्य महाविद्यालय, नादस्वरमंडळ शाळा, शिल्पकला शिक्षणकेंद्र, रुग्णालये, कर्मचारीनिवास, यात्रेकरूंचेसाठी निवास व इतर देवळांचा जीर्णोद्धार, नगरपालिकेला शहरसुधारणांसाठी मदत, तिरुपती विद्यापीठाला १००० एकर जागा व आर्थिक मदत असे अनेक उपक्रम आहेत. तिरुपतीला जाणारी रेल्वेही मीटरगेज होती; पण या देवस्थानाने निम्मा खर्च सोसून ती ब्रॉडगेज करून घेतली. फार काय इथे आता विमानतळदेखील झाला आहे. पंढरपूरला देखील इतके नसले तरी बरेच उत्पन्न यात्रेकरूंकडून मिळते. तिथे याच्या एकशंभरांश देखील समाजोपयोगी कामे होत नाहीत. याला कारण समाजमानसाच्या हृदयसिंहासनावर विराजमान झालेला हा सम्राट अद्याप खाजगी मालकीचा आहे. ही स्थिती दूर होत नाही तोपर्यंत यात्रेकरू उन्हा-पावसात, गटाराशेजारी रांगेत ताटकळताहेत, भरमसाठ पैसे देऊन निवारा शोधताहेत, गुरांच्या डब्यातून प्रवास करताहेत आणि उघड्या गटारातून मैल्याचे पाट वाहाताहेत, ही स्थितीही सुधारणार नाही! ज्यांना ही स्थिती सुधारायलाच नको आहे, ते लोक मात्र 'पहा किती सोशिक आमचा वारकरी, किती अपरंपार त्याची विठ्ठलभक्ती!' अशी ढोंगी स्तोत्रे गात असतात आणि वारकऱ्यालाही 'जितकी कष्टप्रद यात्रा तेवढे जास्त पुण्य!' असा दिलासा वाटत असतो.

'सर्व जगाचा प्रतिपाळ करणारा हा विष्णूचा अवतार इथे शेकडो वर्षे मौजूद असताना आणि लक्षावधींच्या संख्येने त्याचे भक्त मनोभावे त्याचे पूजनकीर्तन करत असताना अगदी परवापर्यंत हा भाग गुलामीत होता आणि अजूनही दारिद्र्य, रोगराई, दुष्काळ, पाणीटंचाई, महागाई, जातीयता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, अज्ञान यात बुडालेला आहे हे कसे? असा प्रश्न जर या भाविक मंडळींना विचारला तर ते पुन्हा एकदा कीव भरल्या नजरेने प्रश्नकर्त्याकडे पहातात आणि उत्तर देतात 'अहो, हे ऐहिक लाभ हा आमच्या वारीचा हेतूच नसतो. नामसंकीर्तनात एकदा ब्रह्मानंदी टाळी लागली की लाभणारे आत्मिक समाधान, मानसिक शांती ही खरी! पिके चांगली येऊन समृद्धी वाढावी ही मागणी विठ्ठलाकडे त्याचा खरा भक्त करणारच नाही. हा स्वार्थ झाला! वरवर पहाता हे तत्त्वज्ञान मोठे उच्च पातळीचे वाटते; पण जरा विचार केल्यावर लक्षात येते की हे आत्मिक समाधान नसून भूल आहे. (Spiritual hallucination) आणि मानसिक शांति नसून बाधिर्य आहे (Mental anaesthasia) रोजच्या भेडसावणाऱ्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून भजनात मन गुंतवणे हा पलायनवाद (Escapism) आहे. परमेश्वरस्तुतीच्या काव्याशिवाय यातून प्रत्यक्ष निष्पत्ती काहीही होत नाही.

बरे, महाराष्ट्रातील जनसामान्याच्या अंतःकरणात अढळ स्थान मिळवून बसलेल्या या दैवताचा इतिहास पाहिला तर फारसा स्फूर्तिदायक नाही. ही मूळची कर्नाटकातील देवता. तिथे आदिलशाहीच्या त्रासाला कंटा-


RUSGARD
*Plastipeel*

प्लास्टिपीलचे
दर्जेदार
उत्पादक

गंजनिरोध

गंजण्यामुळे होणारी झीज वेळीच रोखण्यासाठी एक प्रभावी संरक्षण योजना

उत्पादक

प्लास्टिपील केमिकल्स ॲण्ड प्लास्टिक्स (प्रा.) लिमिटेड

कारखाना व कार्यालय : ए–१७१, वागळे औद्योगिक वसाहत, ठाणे ४०० ६०४.

दूरध्वनी : ५९२०३०
५९५७४१

तार : प्लास्टकोट, ठाणे.
टेलेक्स : पी सी पी ०११–४४९८

ठून व भिऊन हिची पाठवणी महाराष्ट्रात करण्यात आली. इथं या देवतेपासून स्फूर्ती घेऊन स्वातंत्र्ययुद्ध केले व क्रांती केली म्हणावी तर तेही नाही. ' गुलाम लोक आणि त्याचे गुलाम देव ' या लेखात शि. म. परांजपे म्हणतात, ' जसे लोक तसे त्यांचे देव असायचे, स्वातंत्र्यप्रेमी लोकांचे देव स्वातंत्र्यप्रेमीच असणार! अमेरिकन लोकांनी स्वातंत्र्यदेवीची मूर्ती अभिमानाने न्यूयॉर्क बंदरात उभारली आहे. आमचा सर्वसामर्थ्यवान पंढरीचा विठोबा मात्र बिचाऱ्या दामाजीपताने दयाळूपणाने, उपाशी जनतेला वाचवण्यासाठी बादशहाचे धान्य दिल्यावर, त्या परक्या बादशहाला आमच्या लोकांवर राज्य करून वर त्यांना उपाशी मारण्याचा तुला अधिकार काय, असे ठणकावून न विचारता, विठूमहाराचे रूप घेऊन मुकाटपणे त्याचे पैसे चुकते करतो. सेना न्हावी बादशहाची हजामत करायला जायचे विठ्ठलनामाचे संकीर्तनात रंगून गेल्यामुळे विसरला आणि मग आपल्याला शिक्षा होईल म्हणून घाबरला. एखाद्या स्वातंत्र्यप्रेमी लोकांचा देव असता तर या परक्या बादशहाची दाढी खेचून तुला माझ्या भक्तांना गुलामीत ठेवण्याचा अधिकारच काय असे विचारता; पण आमच्या लोकांप्रमाणे त्यांचा देवही गुलामीच प्रिय मानणारा असल्यामुळे तो न्हाव्याचे रूप घेऊन त्या परक्या राज्यकर्त्याची दाढी करत बसला ! '

असा हा भेदरट विठोबा, त्याचे उर्मट पुजारी, बावळट भक्त आणि ढोंगी मंत्री यांची ही यात्रा! ही बंद कसली होते आहे? उलट गावोगावच्या विठ्ठलमंदिरातून आता मिनीपंढरपूर यात्रा भरू लागल्या आहेत ! विठ्ठला, पाडुरंगा, साक्षात् तू सुद्धा रे या देशाला वाचवू शकत नाहीस ! !

□

---

# अंधश्रद्धा आणि परदेशी मदत

काही महिन्यांपूर्वी लॉर्ड फेनर ब्रॉकवे याचा मृत्यू झाला. भारताविषयी आणि एकूणच ब्रिटिश अंमलाखाली असलेल्या मागासलेल्या देशांविषयी त्यांना सहानुभूती होती. असे असतानाही १९६१ मध्ये सरे (इंग्लंड) येथे भरलेल्या ' World Union of free Thinkers ' या संस्थेच्या अधिवेशनात बोलताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, पश्चिमेकडच्या ' भौतिकवादी ' सुधारलेल्या देशांनी पूर्वेकडील तथाकथित प्रगतिशील अशा ' अध्यात्मप्रवण ' देशांना मदत करण्याची अनावश्यक प्रथा तात्काळ बंद करावी !

या मेळाव्याला आशियाई देशातून गेलेल्या एका प्रतिनिधीला इंग्लंडमधील मजूरपक्षाच्या एका संसद-सदस्याने हे विचार व्यक्त करावेत याचे आश्चर्य वाटले. कारण या आशियाई राष्ट्रातील स्वातंत्र्य-सैनिकांची बाजू त्यांनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये मांडली होती. आपण अशा तऱ्हेने मदत करायला का विरोध करता असे विचारल्यावर (त्या वेळचे श्रीयुत) ब्रॉकवे उत्तरले–

' बहुतेक पौर्वात्य देशांचे मानाने आम्ही समृद्ध आहो हे खरे; पण ही समृद्धी अपार कष्ट आणि शास्त्र आणि तंत्रज्ञान यावर अवलंबून राहून आम्ही मिळवली आहे. आमचे ऐहिक आयुष्य सुखाचे जावे म्हणून कोण्या काल्पनिक देव-देवतांची मदत मागून आम्ही ही समृद्धी प्राप्त केलेली नाही. तुम्ही लोक मात्र परलोकात सुख लाभावे म्हणून कल्पित देवाला साकडे घालण्यात वेळ आणि शक्ती वाया घालवत असता ! आम्ही कष्ट करून मिळवलेल्या संपत्तीचा हिस्सा तुम्हाला द्यावा म्हणजे मग भजन, पूजन, चिंतन आणि तीर्थयात्रा करायला तुम्हाला आणखी वेळ वाया घालायला मिळेल अशी तुमची इच्छा आहे काय? तुमच्या देशातील धट्टेकट्टे पुरुष आणि स्त्रिया काम करण्याऐवजी अध्यात्मिक यातायात करण्यात दरवर्षी किती मॅन-अवर्स वाया घालवतात – याची तुम्हाला कल्पना आहे का? आमच्याकडे कामगारांना थोडी विश्रांती मिळून त्यांनी ताजेतवाने होऊन पुन्हा उत्साहाने काम करावे याकरता घंटा वाजवून सूचना देण्यात येते. उलट काही मध्यपूर्वेतील देशात कामाच्या वेळात अनेक वेळा घंटानाद करून मरणोत्तर जगात चिरशांती लाभावी म्हणून प्रार्थना करण्याकरता कामगाराना सूचना दिल्या जातात. देवाच्या प्रार्थना करून तुमच्या सर्व इच्छाआकांक्षा पुऱ्या होत असल्या तर आमच्याकडून मदत मिळण्याची अपेक्षाच तुम्ही कशाला ठेवता?'

हा भडिमार ऐकताच विचाऱ्या पृच्छकाला मूग गिळून गप्प बसावे लागले. कारण ब्रॉकवे म्हणाले त्यात खरोखर तथ्य होते.

□

लेखकाच्या मध्यपूर्वेतील मनमुराद भटकंतीवर व इराणमधील वास्तव्यावर आधारलेली नवी लेखमाला

# रेवरंडू भाऊ

लेखांक तिसरा : विजय परुळकर

ड्रायव्हर हैदरी आणि माझा इराणी सहकारी सर्फराझ ह्यांच्या चेहऱ्यांवर साग्रसंगीत नाश्ता पार पडल्याबद्दलची मनपसंत तृप्ती ओघळत होती. हॉटेलच्या पायऱ्या उतरताना हैदरीनं तोंडावर हात ठेवून ढेकर घशातल्या घशात दाबला आणि सुस्कारा सोडत 'या अली !' म्हणत चेहरा एकदम सुतकी केला. सर्फराझनं देखील ताबडतोब हैदरीचं अनुकरण केलं. दोघांच्या चेहऱ्यांकडे पाहिलं तर वाटावं-गरीब बिचारे अनेक दिवसांचे उपवासी असावेत ! त्यांचे गंभीर, सुतकी आणि धर्माळू चेहरे आंबटपणे पहात मी सिगरेट पेटवली.

सर्फराझ झटकन माझ्याजवळ आला आणि खांद्यावर हात ठेवीत कानात पुटपुटला-'रमझान आहे-शक्यतो बाहेर चारचौघात सिगरेट न ओढलेली बरी. उगाचच लोकांच्या भावना दुखावतील. गाडी रस्त्याला लागली की पेटव सिगरेट-चोराचा संन्याशाला उपदेश म्हणतात तो ह्याच असावा.

ज्यांच्या भावना दुखविल्या जाण्याची शक्यता होती ते इराणी रेस्टॉरंटच्या पायऱ्या उतरताना हैदरीप्रमाणेच तोंडावर हात ठेवून, ढेकर दाबत अलीच्या नावानं सुस्कारे टाकत होते. पेटवलेली सिगरेट मी टाचेखाली चिरडली आणि अतिशय हसऱ्या चेहऱ्यानं सर्फराझकडे पहात हलक्या मृदु आवाजात एक असली कोल्हापुरी शिवी दिली. सर्फराझनं किंचित स्मित करून शिवीचा स्वीकार केला. पसंतीदर्शक मान हलवली आणि तो एका फळविक्रेत्याच्या दुकानापाशी गेला. चेहऱ्यावर मात्र असा भाव होता की 'अरे बाबा-रमझान आहे... चारचौघात इतका रुंद चेहरा करून हसू देखील नकोस...गंभीर रहा...!'

सर्फराझला काय म्हणायचं असेल ते असो; माझं तोंड मात्र जास्तच आंबट झालं हे खरं. हसऱ्या चेहऱ्यानं मृदु भाषेत कोल्हापुरी शिवी दिल्याचा परिणाम असावा.

हैदरी गाडीचं बॉनेट उचलून तेल-पाणी तपासत होता. मी उगाचच डोकं खुपसून गाडीचं इंजिन बघत होतो. सर्व ठाकठीक असल्याची खात्री झाल्यावर हैदरीनं बॉनेट बंद केलं आणि गाडी स्टार्ट केली. हातामध्ये पाच-सहा मोठाले पुडके सावरत सर्फराझ फळांच्या दुकानाकडून आला. दोन डझन मुसुंबी, दोन डझन संत्री, दोन किलो काकड्या आणि भोपळा-कलिंगड-टरबूज-सूर्यफूल ह्यांच्या खारवलेल्या बिया वगैरे खाद्य पदार्थांचे पुडके त्यानं मागील सीटवर काळजीपूर्वक रचले आणि आमची गाडी इस्फहानच्या दिशेनं धावू लागली.

एक-दोन वळणं पार करताच हैदरीनं वेग वाढवला. दोन्ही बाजूचं वाळवंट विरुद्ध दिशेनं पळू लागलं. बाणासारखा सरळसोट रस्ता दश्त-ए-कवीर छेदत राहिला. मनात एकदम बायकोचा विचार आला. कोसबाडच्या हिरव्यागार परिसरात आत्ता ह्याक्षणी सरोजा काय करीत असेल ?

-पण सर्फराझनं विचारात रमण्यास वावच दिला नाही. मागील सीटवरून हात पुढं करून, संपूर्ण सोललेलं हिरवट पांढरं मुसुंब त्यानं माझ्यासमोर 'पेश' केलं. विजेचा झटका बसावा त्याप्रमाणे माझ्या बत्तिशीतून कळ उठली. अंगावरचे केस शिरशिरून ताठ झाले. मी ओठ गच्च दाबून मानेनंच नकार दिला. सकाळी-सकाळीच लिंबाच्या रसानं आंबलेल्या दातांनी सोललेल्या मुसुंब्याला स्पर्श करण्याची हिंमत नव्हती !

माझ्या कडक उपवासाबद्दल आश्चर्य व्यक्त करत त्यानं मुसुंब हैदरीला दिलं. पठ्ठ्यानं आख्खंच्या आख्खं तोंडात कोंबलं आणि सुरस घुटके घेत रसाळपणे तो मुसुंब चघळू लागला. आपले दात आंबले असताना समोर कुणी तरी जर हिरवीगार चिंच कराकरा खात चिडवलं तर जसं होईल तशी माझी अवस्था झाली. मी खिडकीतून मान बाहेर काढून क्षितिजापर्यंत पसरलेलं ओसाड वाळवंट पाहू लागलो. सुदैवानं माळरानाचा रंग मातकट-भगवा होता. कारण ह्या क्षणी तरी नुसता हिरवा रंग पाहून देखील माझ्या मस्तकात कळ उठली असती !

-कोसबाडचे-सरोजाचे विचार अर्थातच मनातून नाहीसे झाले. अथांग पसरलेल्या वाळूकडे मी नुसताच पहात राहिलो.

सर्फराझ एकामागून एक मुसुंब किंवा संत्र सोलत होता. स्वतः खात होता, हैदरीला आग्रह करत होता. हैदरी विनयानं नको नको म्हणत तोंडात फोडी कोंबत होता. माझ्याकडं अधूनमधून पहात

ओशाळवाणं लाजरं हसत होता. संत्री–मोसंबी संपली तेव्हा सर्फराझनं खिशातून एक बारका चाकू काढला आणि सफाईनं काकड्या सोलायला सुरुवात केली. गाडीत काकड्याची कुरुम कुरुम सुरू झाली. काकड्याचा फडशा पाडल्यावर दोघे थोडेसे 'रिलॅक्स' झाले आणि शांतपणे खारवलेल्या बिया टुचुटुचु फोडू लागले. मला पोपटाच्या पिंजऱ्यात बसल्यासारखं वाटू लागलं !

वास्तविक माझ्या तीन वेळच्या जेवणाइतका ह्या प्रत्येकाचा 'ब्रेक–फास्ट' झाला होता. त्यानंतर मला महिनाभर पुरतील इतकी फळं दोघानी अर्ध्या तासात संपवली होती ! आणि आता खारवलेल्या बिया दाताखाली टुचुटुचु फोडत त्यांची मुखशुद्धी सुरू झाली होती !

त्यांचा नाश्ता आणि फलाहार बघूनच मला बद्धकोष्ठाची भावना झाली होती. ह्यांचं 'भोजन' हा प्रकार कसा असेल ?–मी विचार करायच्या भानगडीतच पडलो नाही. प्रसंग आला की पहाता येईल असं ठरवून कानावर पडणाऱ्या बियांच्या टुचुटुचुकडं दुर्लक्ष करून दोघं काय बोलत होते ते ऐकण्याचा प्रयत्न करू लागलो.

ते जे बोलत होते ते अगदी जवळचं आणि ओळखी–ओळखीचं असं वाटत होतं; पण अर्थबोध मात्र होत नव्हता. त्यांच्या बोलण्याला एक 'म्युझिकल टच' होता. मन्द्र सप्तकात दरबारीची अस्ताई कानावर पडावी तशा प्रकारचं शब्द उच्चारणं. वाक्यांना लय होती–धिमी–मध्यलयीसारखी. अधूनमधून हे सवाल–जबाब आडाचौतालमध्ये चालल्यासारखे वाटत. अतिशय मिठी जबान. मिठी आणि डौलदार. काहीशी भारदस्त आणि रुबाबदार; पण नाटकी नव्हे. सहज सुंदर बोलणं ऐकत राहण्यासारखं !

¤

आणि अचानक मला 'मुगले–आझम' ह्या चित्रपटाची आठवण झाली. सोळा–सतरा वर्षं इतका काळ खाल्लेला हा चित्रपट १९६१–६२ साली जवळजवळ पूर्ण होत आला होता तेव्हा मी पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटमध्ये छायाचित्रणाचा कोर्स करत होतो. मुगले–आझमचे छायाचित्रकार आर. डी. माथूर आठवड्यातून एक दिवस मुंबईहून 'गेस्ट लेक्चरर्' म्हणून यायचे.

प्रभात स्टुडियोच्या स्टुडियोनंबर एकच्या भव्य पण भकास 'गोडाउन' वजा शेडमध्ये एखादा प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा मोडकातोडका पुतळा उभा केला जायचा. आजूबाजूला 'सोलर', 'फ्लड' 'स्पॉट' किंवा इंकी–डिंकी वगैरे लाइटस्. त्यापैकी सोलर पेटवून 'हा की लाइट' अशी माथुरसाब सुरुवात करायचे. दुसरा दिवा पेटवण्याअगोदर एखादा विद्यार्थी मुगले-आझमच्या शुटिंगबद्दल प्रश्न विचारायचा आणि मग प्रकाशयोजनेच्या शास्त्राचा विसर पडून सिनेजगताच्या चविष्ट गप्पा सुरू व्हायच्या.

माथुरसाब आपल्या मऊसूत भाषेत आम्हाला-काल मधुबाला काय म्हणाली, दिलपजीच्या एका शॉटला पंधरा री–टेक कसे झाले, पपाजी पृथ्वीराज आणि के. असीफ ह्यांच्यात काय चर्चा झाली वगैरे हकीकती घोळवून घोळवून ऐकवायचे. बहुतेक विद्यार्थी त्या गप्पात भान हरवून जायचे. मला मात्र वैताग यायचा !

स्टुडियो नंबर एकच्या मध्यभागी नुसताच 'की लाइट' पडलेला प्लॅस्टर ऑफ पॅरिसचा एक अर्धनग्न, मोडकातोडका पुतळा आणि रसपूर्ण गप्पा मधुबाला–दिलीपकुमारच्या. कंटाळून मी 'इंकी डिंकी' चं स्विच ऑन–ऑफ करीत राहयचो.

–तर 'मुगले–आझम' जेव्हा एकदाचा पूर्ण झाला आणि पुण्यात आला तेव्हा उत्सुकतेनं पहायला गेलो. पपाजी पृथ्वीराज अकबरजी झाले होते. डायलॉग फेकताना ते सारखे आपले शरीर घुसळवून, गालाची सफरचंदं फुरफुरवत खर्जामध्ये खिंकाळल्याप्रमाणे फार्सी मिश्रित उर्दू 'खोकायचे.' माझी हसून हसून मुरकुंडी वळायची !

मध्यंतराच्या वेळी शेजारी बसलेला एक उत्तर हिंदुस्थानी काहीशा नाराजीनं मला दाटत म्हणाला–' अरे भाई, आप म्हारास्ट्र के लोगों को सीधी हिंदी मुष्किलसे समझती है ... ये तो असली फार्सी है .. पियुवर, फार्सी–उर्दू की मॉदर–ए–जबान...अगर आपको समझती नही तो चुप बैठो...मझाक क्यूं उडाते हो ..'

¤

–इराणच्या वाळवंटी भागातून रस्ता कापत मी इस्फहानला चाललो होतो आणि माझे हमसफर आपल्या मॉदर–ए–जबान फार्सीमध्ये गप्पा मारण्यात रंगले होते. त्यांची जबान पृथ्वीराजांनी वठवलेल्या अकबरच्या सोंगासारखी हास्यास्पद निश्चित नव्हती. पृथ्वीराज कपुरांनी के. असीफसाहेबाच्या बरोबर संगनमत करून 'मुगळ्याचा आजीमभाई' सादर केला होता आणि हिंदी प्रेक्षक आपण 'मुगले–आझम' पहातो आहो अशा गैरसमजुतीनं दाद देत होता. समजलं नाही तर असल्या गोष्टीना दाद देण्याची आपल्याला सवय आहेच !

मुंबईचा माझा एक धनाढ्य मराठी मित्र स्वतःला गाण्याबजावण्यातला दर्दी समजायचा. त्याच्या घरातील वातावरण 'उच्च' अभिरुचीला शोभेसं. डायनिंग टेबलभोवती हा टाय लावून जेवायला बसायचा. काटेचमचे अर्थातच आवश्यक. मुलं डॅड–मॉम आणि 'प्लीज–थॅंक्यू' संस्कृतीत वाढलेली. घरातील अद्ययावत ध्वनियंत्रणेवर सदैव 'वेस्टर्न म्युझिक' आणि भारतीय संगीत असेल तर ते उत्तरहिंदुस्थानी आणि 'गझल' वगैरे टाइपचं. हा मित्र मला नेहमी म्हणायचा 'विजा लेका, काय ती रडवी भावगीतं आणि टाळकुटं अभंग आणि भजनं ऐकतोस; गझल ऐक गझल ! गझल मधला दर्द तुमच्या फालतू भावगीतात कधीच येणार नाही! –'

हा माझा श्रीमंत मित्र म्हणायचा, 'लेका, तू बाहेर जग भटकून शेवटी गावढळच राहिलास. तुला लेटेस्ट ट्रेंड माहीतच नाहीत !' मी त्याला म्हणायचो, 'अरे भाई, गझलमध्ये बडा मझा असतो. नाही कोण म्हणतोय ? त्यातील उर्दू किंवा फार्सी शब्दांचा अर्थ जरी कळला नाही तरी 'वाह्' केव्हा म्हणायचं हे सवयीनं सर्वांनाच उमगतं–गझल ऐकणं, पाश्चात्य संगीत ऐकणं हे उच्च अभिरुचीचं लक्षण मानलं जातं... माझं त्याबद्दल काहीच म्हणणं नाही... मला आपलं कधीमधी वाटतं की हे उत्तरहिंदुस्थानी संगीत काय किंवा वेस्टर्न काय... आपल्यावर राज्य करून आम्हाला गुलाम बनविणाऱ्यांची ही कला ... कलेच्या बाबतीत आप–परभाव नसावा हे कबूल... पण आपली अशी काही खास भारतीय गायनकला असेलच की नाही ?– तर एम. एस. सुब्बालक्ष्मी ऐकून कर्नाटक संगीत समजावून घेण्याचा आम्ही का प्रयत्न करू नये ?'

मित्र म्हणायचा 'तू येडा आहेस ... ते येंडू–मुडू कर्कश कर्नाटक संगीत ऐकणार कोण ? ते काय म्युझिक आहे ... मृदुगम आणि

विचित्र कोणावाले हे मद्रासी पोटात कळ आल्याप्रमाणे विव्हळतात ! त्याना म्युझिकचा अस्थेटिक सेन्स तरी आहे का ? फय्याझ खासाहेब ऐक !–'

ह्या मित्राबरोबर मी शक्यतो हे विषय टाळायचो; पण त्याची वेस्टर्न आणि गझलची खाज जशी वाढत गेली आणि ' पसायदा-नाला' शिव्या देण्यापर्यंत मजल गेली तेव्हा मी त्याला कायमचाच टाळला. आज खैबरनामा लिहिताना माझी खात्री आहे की मेहदी हसन मुंबईला आला तेव्हा हे महाराज त्याच्या प्रत्येक बैठकीला पुढं बसून सर्वांपेक्षा मोठ्या आवाजात 'वाह्' अशी दाद देत असणार ! असो.

¤

मी इस्फहातला चाललो होतो तो काळ १९७२ च्या सुमाराचा. गाडीत हैदरी आणि सर्फराझच्या गप्पा रंगात आल्या होत्या. दूरवर उन्हामध्ये सोनेरी रंगाचे मिनार आणि घुमट चमकत होते. कोम (गोम ?) शहर जवळ येत होतं. सर्फराझ काही तरी विनोदी आणि आचरट बोलला असावा... हैदरी खळखळून हसत होता. मी काहीसं वैतागून म्हणालो-'लेको, तुम्ही दोघं मघापासून इतकं बडबडताय मला एक अक्षर समजत नाहीये–पाव्हण्याशी वागायची तुमची हीच रीत काय.. अरे, निदान ' जोक' काय होता ते तरी सांगा !' मनात म्हटलं हसून तरी तोंडाचा आंबटपणा घालवता आला तर पहावं; नाही तर दुपारी जेवणाची पुन्हा बोंब ! सर्फराज थोडा ओशाळला. माझ्या खांद्यावर थोपटत समजुतीच्या स्वरात म्हणाला–

' आम्ही पर्शियन माणसं जरा अशीच. एकदा आमच्या मातृ-भाषेत आम्ही बोलू लागलो की आम्हाला भोवतालच्या जगाचा विसरच पडतो. आमची भाषाच तशी आहे आणि आम्हाला वाटतं सगळ्यांना आम्ही काय बोलतो ते समजतं, आगा-ए-विजे–तू फार्सी शीक ! एकदा फार्सी शिकलास की स्वतःची मातृभाषादेखील विसरून जाशील! फार्सी बोलायची सवय झाली की दुसरी कुठलीच भाषा बोलू नयं असं वाटतं.'

केव्हढा स्वतःच्या भाषेचा अभिमान ! केव्हढं स्वतःच्या भाषेवर प्रेम ! नाही तर आम्ही ! काहीशा त्रासिकपणे मी म्हटलं-'आगा ए-सर्फराझ, मला इराणमध्ये येऊन अवघे दोन दिवस सुद्धा झाले नाहीत. जरा सबुरीनं घे! मी जरूर पडल्यास फार्सी अवश्य शिकीन. मला आवडेल तुमची भाषा शिकायला.' सर्फराझचा चेहरा आनंदानं फुलून उठला. आवाज खर्जाच्या खाली नेत तो म्हणाला, ' तुमची भाषा म्हणू नकोस. आमची भाषा म्हण ! संस्कृत आणि पर्शियन बहिणी बहिणी का मायलेकी हे मला माहीत नाही. दोघींचा पिता एक एव्हढं मात्र मला खात्रीपूर्वक वाटतं. इराण म्हणजे आर्यांना दोन्ही भाषांचं जन्मस्थान-आणि तुला सांगू, हिंदी माणसाला फार्सी लवकर येते आणि त्याचे उच्चार सुद्धा स्वच्छ असतात. इराणमध्ये पुष्कळ हिंदी आहेत, अगदी तुमचे सरदारजी देखील उत्कृष्ट फार्सी बोलतात! मात्र पाकिस्तानी लोकांचे फार्सी उच्चार एकदम वाईट... उर्दूच्या सवयीमुळं पाकिस्तानी लोक कमअस्सल दर्जाचं फार्सी बोल-तात... अरे, आम्ही तर फार्सी उच्चारावरून माणूस हिंदी का पाकि-स्तानी हे ओळखतो!

'बाबा रे! तुझं फार्सीवरचं लेक्चर जरा आवर!' मी त्याला थांब-वत म्हटलं. मनात कुठे तरी उगाचच सुखावल्यासारखं वाटत होतं. पाकिस्तान्यापेक्षा हिंदी माणूस जास्त चांगलं फार्सी बोलू शकतो हा शोध नवीन होता. मी सर्फराझला म्हटलं, 'तो जोक काय होता ते सांग आणि हे जे गाव समोर दिसतंय ते कोम का गोम-आमच्याकडे घुमटाला गुंबज किंवा गुंबद असं म्हणतात. इथं हा सोनेरी घुमट आहे म्हणून गुंबजचं तुम्ही गोम किंवा कोम केलंत का ?'

सर्फराझ हसला. जोक सांगायचं सफाईनं टाळत म्हणाला–' हे कोम नाही आणि गोम नाही. उच्चार क आणि ग मधला आहे. इंग्रजीत लिहिता न येणारा उच्चार आहे. पूर्वी Com असं लिहायचे. आता Qom किंवा Qum असं लिहितात. पण दोन्ही चूक; हे एक अतिशय प्राचीन शहर आहे. अरबांनी इराणवर हमला करून इस्ला-मचा झेंडा रोवला त्याच्याही अगोदर हे शहर व्यापारासाठी प्रसिद्ध होतं. अरब म्हणतात त्यांनी हे गाव वसवलं; पण ते साफ खोट आहे. ह्या शहराचं जुनं नाव कुमिन्दान. इस्लाममध्ये जेव्हा शिया आणि सुन्नी ह्यांच्यात लढायाना सुरुवात झाली तेव्हा अशारी अरब जमातीचे जे शिया अरबस्तानातून पळाले ते कुमिन्दानमध्ये स्थायिक झाले. त्याच्यातील एक अशारी अरब पुढं कुमिन्दानचा मुख्य झाला. हा लेकाचा अत्यंत आळशी होता. सदैव खाटेवर तंगड्या पसरून आकाशाकडे पहात पडून राहिलेला असायचा. त्याची बायको महा-तापट! ती जाता-येता त्याला म्हणायची– 'याऽऽराजुल...कोम्म !' (भल्या माणसा– ऊठ ! ) येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या कानावर सतत हे शब्द पडायचे. त्यातून नाव पडलं कोम्म् आणि त्याचं पुढं कोम झालं...समोर जो सोनेरी घुमट दिसतो ना, ती अनारबार नदीच्या काठी असलेली फातिमेची कबर आहे. हजरत–ए–मासुमेह्... इराणमधली ही एक अत्यंत पवित्र जागा मानली जाते. बिगर मुसलमान लोकांना इथं प्रवेश सक्त मना आहे. फातिमेच्या कबरेचं दर्शन घेतल्यास स्वर्गप्राप्ति निश्चित असं इमाम रेझानी शिया मुसलमानांना आश्वासन दिलं आहे. फातिमे ही इमामरेझाची बहीण. काशान ह्या गावापासून ती मशहद येथे आपल्या भावाच्या भेटीसाठी जात असता इथंच वाटेत आजारी पडून पैगंबरवासी झाली. आपण ज्या इस्फहान गावाला चाललोय, ते जगप्रसिद्ध शहर ज्या शहा अब्बासनं बांधलं त्यानंच हजरत–ए–मासुमेह बांधली. शहा अब्बास मोठा हुषार राजा. इराणच्या शिया मुसलमानांना अरबस्तानातील नफझ आणि करबला ह्या पवित्र स्थानांच्या वारीच्या वेळी सुन्नी अरबांकडून अपमानास्पद वागणूक मिळायची. इराणच्या शियांनी करबलाची वारी करण्याऐवजी मशहद येथील इमाम रेझा आणि कोम येथील हजरत–ए–मासुमेहच्या वाऱ्या कराव्या अशी प्रथा शहा अब्बासनं पाडली. स्वतः शहा अब्बास अठ्ठावीस दिवस पायी चालत इस्फहानहून मशहदला इमाम रेझाच्या दर्शनास गेला. गंमत म्हणजे शाह आब्बासनं पवित्र स्थानाच्या दर्शनासाठी जी अठ्ठावीस दिवसांची पदयात्रा केली त्याचं मूळ आमच्या इस्लामपूर्व पर्शियन–झोरास्ट्रियन संस्कृतीमध्ये आहे. दीड-दोन हजार वर्षांपूर्वी सासानी वंशाचे झोराष्ट्रियन राजे स्टसीफॉनपासून अझरबैजानपर्यंत पायी चालत जाऊन तेथील मंदिरातील पवित्र अग्नीचं दर्शन घ्यायचे !'

हजरत–ए–मासुमेहसमोर हैदरीनं गाडी पार्क केली. पाच मिनिटात दर्शन घेऊन येतो म्हणून दोघं गेले. मी गाडीत बसून

राहिलो. शहर तसं बकालच दिसत होतं. तशात रमझान. सर्वत्र अवकळा पसरल्यासारखं वातावरण. एक गोष्ट मात्र प्रामुख्यानं जाणवली, तेहरानपेक्षा इकडचं वातावरण एकदम वेगळं. तेहरानमध्ये एखाद्या युरोपियन शहरात असल्यासारखं जे वाटलं त्याच्या अगदी विरुद्ध कोम. सर्वत्र इस्लाम स्पष्टपणे जाणवत होता. लांब झगे घातलेले, फेटा आणि दाढीधारी सय्यद गंभीर करारी चेहऱ्यानं ये-जा करीत होते. 'चादोर' न पहेनलेली एकही स्त्री नजरेस पडत नव्हती. गाडीत बसल्या-बसल्या सिगरेट पेटविण्याची तलफ आली; पण धैर्य झालं नाही. इथं भावना विवना दुखविण्याचा प्रश्नच आला नसता. मी सिगरेट पेटवताच एखाद्या सय्यदनं माझा तात्काळ खून केला असता!

कलकत्याला कालीमातेच्या मंदिरात गेल्यावर तिकडचा उग्र वातावरणाचा मनावर जसा एक विचित्र दबाव पडतो तसंच काहीसं कोममध्ये गाडीत बसल्या-बसल्या मला वाटत होतं. हजरत-ए-मासुमेहच्या कमानीतून हैदरी आणि सर्फराझला बाहेर पडताना पाहून मी नकळतच सुटकेचा श्वास सोडला.

सर्फराझनं मला गाडीतून उतरायला सांगितलं आणि शेजारच्या एका हॉटेलच्या उंच इमारतीपाशी नेत म्हणाला– 'वरच्या मजल्यावरून तुला आतील पटांगण पहाता येईल!'

¤

हजरत – ए – मासुमेहच्या सोनेरी घुमटावरची हजार कबुतरं अचानक उडाली. घिरट्या घालून काही थवे सोनेरी मिनाऱ्याच्यावर उतरले. काही घुमटाभोवती प्रदक्षिणा घालत राहिले. आतील विस्तीर्ण पटांगण स्त्री-पुरुषांनी भरलं होतं. काहीजण नमाज पढत होते. काही कुराण वाचत होते अनेकजण एका भिंतीशी डोकं टेकून हुंदके देऊन रडत शोक करत होते. इतर अनेक 'तस्पी' घेऊन मणी ओढत समाधिस्थ बसले होते. पवित्र कबरीच्या आतून येजा चालू होती.

– पाच-सहा हजारांचा समुदाय पण बडबड नाही, गोंधळ नाही. सर्व कारभार अतिशय शिस्तबद्ध! सर्व पटांगण अप्रतिम स्वच्छ. कुठं कागदाचं चिटोरं किंवा घाण शोधूनही सापडणार नाही असं. गळ्यातील कॅमेरा मी डोळ्याला लावला. सर्फराझनं मना केलं. म्हणाला– 'रमझानच्या वेळी नको. नंतर केव्हाही तू फोटो काढ! रमझान संपल्यानंतर हवं तर मी तुला आत देखील घेऊन जाईन!' मी त्याच म्हणणं मानलं.

¤

गाडीकडे वापस आलो. गाडी सुरू झाली. कोमची वेस ओलांडेपर्यंत हैदरी आणि सर्फराझ न बोलता गप्प बसून होते. मला पोटात उगाचच ढवळल्यासारखं, घशात मळमळल्यासारखं वाटत होतं. गाडीत एक कसला तरी उग्र, तेलकट गोडूस वास भरला होता. हलवायाच्या दुकानासारखा. त्या वासानंच मळमळत असावं; पण हा असला वास शिरला कसा गाडीत?

मला जास्त वेळ कोड्यात रहावंच लागलं नाही. मागील सीटवरून पत्र्याचा डबा उघडल्याचा आवाज झाला. तेलकट गोडूस वासाचा भपकारा नाकात शिरला. मी मागं वळून बघितलं. माझ्या समोर भुईमुगाच्या पेंडेसारखी दिसणारी एक गोल चकती धरत सर्फराझ म्हणाला–

'खाऊन बघ. ही कोमची स्पेशॅलिटी...सोहन हलवा!'

मी चकतीचा तुकडा मोडून तोंडात टाकला. जीभ आणि घसा तुपानं रापला. सगळ्या तोंडभर गुळमट गुळमट चव भरून राहिली. हैदरी आणि सर्फराझ तन्मयतेनं सोहन हलवा फस्त करत होते. मी सर्फराझला म्हटलं– 'तू मला अजून मघाचा जोक सांगितला नाहीस! सीक्रेट जोक आहे का?' सोहन हलव्याचा तुकडा चघळत सर्फराझ म्हणाला– 'म्हटलं तर सीक्रेट आहे– कोमबद्दल आहे...शक्यतो परदेशी माणसाला आम्ही तो सांगत नाही; पण ऐक. मी सांगितलं नाही तरी दुसरं कोणी तरी तुला सांगणारच.कोम एक गोष्टीसाठी तसं फेमस आहेच!' सर्फराझ काहीशा दबलेल्या आवाजात सांगू लागला.

'अरे, आम्ही सगळे शिया मुसलमान हे तर तुला माहीतच आहे. इस्लाममध्ये व्यभिचार किंवा शरीरविक्रय, वेश्याव्यवसाय ह्याला मनाई आहे. एव्हढंच नाही तर व्यभिचार करणाऱ्याला, शरीरविक्रय करणाऱ्याला दगडानं ठेचून मारण्याची सजा इस्लाममध्ये आहे. सुनी मुसलमान हे अगदी कट्टर परंपरावादी आम्ही शिया त्यामानानं खूपच सुधारित विचाराचे. आमच्यात सीगे म्हणून लग्नाची एक पद्धत आहे. सीगे म्हणजे ठराविक मुदतीचं लग्न. मग ही मुदत एक तासाची, एक दिवसाची किंवा नव्याण्णव वर्षांची असेल! आलं का तुझ्या लक्षात? एखादीबरोबर शय्यासोबत करण्यापूर्वी सीगे केलं म्हणजे झालं. मग व्यभिचार होत नाही. कोम हे सीगेसाठी प्रसिद्ध आहे. इथं मामुली पैसे घेऊन झटपट सीगे लावून देणारे अनेक मुल्ला आणि सय्यद आहेत. कोम ही तेहरानमधील मजनूंची आवडती जागा. कोममध्ये शय्यासोबतीला तयार असणाऱ्या खूप मुलीपण रस्त्यात घुटमळत असतात. 'चादोर' ओढण्याची त्यांची एक विशेष पद्धत असते. त्यावरून ह्या मुली ओळखता येतात. आपला हैदरी बॅचलर आहे म्हणून मघाशी मी त्याला म्हणत होतो की, हवं असल्यास तू सीगे उरकून ये! आम्ही अर्धा तास गाडीत थांबतो. अरे, अगदी ऑफिसच्या कामासाठी कुणाला कोमला जायचं असलं तरी सगळे 'काय मग कोमला मझा करणार ना?' अशी थट्टा करतात. असं प्रसिद्ध शहर आहे हे.'

'रेझा शहाच्या कारकीर्दीत तर कोम फार गाजलं'–सर्फराझ रंगात येऊन सांगू लागला–'रेझा शहा बुजुर्ग इराणचा शहनशहा झाला आणि त्यानं पहेलवी घराण्याची स्थापना केली. पहेलवी म्हणजे इराणची अतिशय प्राचीन अशी आद्य लिपी. रेझा शहाला इराणच्या प्राचीन संस्कृतीचा जबरदस्त अभिमान. अरबांनी आक्रमण करून इराणवर इस्लाम लादला असं रेझा शहा नेहमी म्हणायचा. गादीवर बसल्यानंतर एक फर्मान काढून, सर्व देशाचा धर्म बदलून पुन्हा झोरास्ट्रियन होण्याचं त्याच्या मनात होतं; पण नजदीकच्या सल्लागारांनी त्याची परोपरीनं समजूत काढून ह्या विचारापासून त्याला परावृत्त केलं. रेझा शहाला आपला देश आधुनिक व्हावा ह्याबद्दल अतिशय कळकळ होती. शेजारच्या तुर्कस्तानमध्ये केमाल पाशा आतातुर्कनं टर्कीच्या आधुनिकीकरणाचा आरंभ केला होता. टर्की एखाद्या पाश्चिमात्य देशाच्या तोडीचं राष्ट्र व्हावं म्हणून आतातुर्क औद्योगीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा पाठपुरावा करत होता. टर्कीमधील परंपरावादी सुनी मुसलमान मुल्लांचा

विरोध आतातुर्कनं यशस्वीपणे हाणून पाडला होता. रेझा शहानं टर्कीचं अनुकरण करण्याचा निश्चय केला. त्यानं 'चादोर' किंवा इराणी बुरख्याला कायद्यान वदी घातली आणि इस्लामिक स्त्रीमुक्ती आंदोलनाची पायाभरणी केली. इस्लामिक कायद्याऐवजी नवा संसदीय कायदा घडवून स्त्रियांना समान हक्क आणि समान संधी प्राप्त करून दिली. कडव्या मुसलमान मुल्लांना आणि सय्यदांना रेझा शहाच्या ह्या सुधारणा अमान्य होत्या. त्यांनी विरोध दर्शविला. एकदा रेझा शहानं निवडक अशा तीस-चाळीस मुल्लामौलवींना महालावर जेवण्यासाठी निमंत्रित केलं. मुल्लांना वाटलं रेझा शहा वाटाघाटी करणार! आपल्यापुढे नमणार! मुल्लामौलवी खुषीत आणि ताठ्यात राजमहालावर गेले. सर्वांना एका बगिचात नेण्यात आलं आणि काय होतंय हे कळण्याअगोदर तीन-चार मशीनगनधारी सैनिकांनी फैरी झाडून गोळ्यांची बरसात केली आणि चाळीस मुल्ला पैगंबरवासी झाले. इराणमधील इतर मुल्ला भयानक घाबरले. अनेक जण भूमिगत झाले. काही जण युरोप-पॅरीस इथं पळाले. त्यानंतर रेझा शहानं आणखी एक फर्मान काढलं. पहेलवी टोपीच फर्मान. प्रत्येक इराणी नागरिकानं डोक्यावर पहेलवी टोपी घातलीच पाहिजे असा कायदा केला. डोक्यावर सपाट गोलाकार असणाऱ्या ह्या टोपीला कपाळावर कौटीकॅपप्रमाणे पुढं येणारा अर्धचंद्राकृती पुठ्ठा असायचा. मुल्लांनी तक्रार केली. शिया मुल्ला किंवा सय्यद ह्यांनी एक ठराविक पद्धतीचा फेटा डोक्यावर बांधला पाहिजे अशी धर्माची आज्ञा असल्याचं त्यांनी रेझा शहाला सांगितलं. रेझा शहा मानेना. शेवटी मुल्ला म्हणाले की, ही टोपी डोक्यावर घातल्यास कपाळावरील अर्धचंद्राकृती भागामुळे पवित्र कुराणावर डोकं ठेवताना कपाळाचा कुराणाला स्पर्श होऊ शकत नाही. रेझा शहा म्हणाला— मग टोपी उलटी घाला! लांब झगे घातलेले मुल्ला उलटी टोपी घालून भयंकर विनोदी दिसू लागले. रस्त्यातून चालताना लोक त्यांची थट्टामस्करी करू लागले; पण रेझा शहानं हट्ट सोडला नाही.

मी रेझा शहाच्या ह्या नवलकथा ऐकण्यात रंगलो. पंडित नेहरूंच्या इतिहासाच्या पुस्तकात कॉसॅक फलटणीमधील रेझा खान नावाच्या एका मनस्वी हवालदाराने इराणमधील कजर घराण्याची बेत्रदशाही मोडून पहेलवी साम्राज्याची स्थापना केली एवढा ओझरता उल्लेख वाचल्याचं आठवत होतं. सर्फराझ जे सांगत होता ते सर्वच आश्चर्यकारक आणि नवीन होतं. ह्या पहेलवी सम्राटानं इराणचा इस्लामधर्म बदलून सारा देश खरोखरीच झोरास्ट्रियन केला असता तर? तर कदाचित टाटा वगैरे मंडळी मायदेशी परतली असती. इराण केव्हाच प्रगतीच्या मार्गानं वाटचाल करून आतापर्यंत जपान-जर्मनीच्या बरोबर किंवा पुढं देखील गेला असता. सर्फराझ सांगत होता—

'अरे, एकदा ह्या रेझा शहानं आपल्या बेगमला बुरखा न घालता उघड्या जीपमधून आपल्या चार-पाच सहेलियांसकट तेहरानपासून कोमपर्यंत जाण्यास सांगितलं. त्याचप्रमाणे कोमला हजरत-ए-मासुमेदमध्ये जाऊन नमाज पढण्याची आज्ञा केली. बुरखा न घातलेली बेगम उघड्या जीपमधून जाताना पाहून अनेक इराणी स्त्रियांनी बुरख्याचा त्याग केला. बेगम जेव्हा कोममधील पवित्र स्थानाशी पोहचली तेव्हा तेथील मुल्लानं मात्र तिला 'चादोर' शिवाय हजरत-ए-मासुमेदमध्ये प्रवेश करण्यास मनाई केली. बेगमनं रेझा शहाला फोन केला. रेझा शहा भयंकर खवळला. एक जीप आणि चार अंगरक्षक बरोबर घेऊन संतप्त सिंहासारख्या डरकाळ्या फोडत तो कोममध्ये घुसला. मुल्लाला त्यानं स्वतःच्या हातानं फरफटत भरचौकात आणलं आणि हंटरनं फोडून काढलं—असा हा रेझा शहा. मुल्लामौलवींनी त्याच्या नावाची धास्ती घेतली. आतून ते खूप जळले; पण ह्या शहनशहासमोर त्यांची डाळ शिजली नाही... रेझा शहानंतर नुकत्याच मरण पावलेल्या शहनशहा आर्यमिहरनं मात्र मौलवींना अनेक सवलती दिल्या. ज्यांना चादोर वापरायची असेल त्यांना परवानगी दिली. मुल्ला आणि सय्यद पहलवी टोपी न घालता पुन्हा फेटे बांधू लागले.

'रेझा शहा बुजुर्गनं आणखी एक महत्त्वाची सुधारणा केली. इस्लामनंतर फार्सी भाषेत बरेच अरेबिक शब्द घुसले होते. रेझा शहानं फार्सी भाषातज्ज्ञांचं एक मंडळ नेमून भाषेचं शुद्धीकरण केलं. एकूण एक अरेबिक शब्द निवडून बाहेर काढला. त्या जागी योग्य तो फार्सी प्रतिशब्द निर्माण केला आणि फार्सीला आलेलं ओंगळ अरेबिक स्वरूप धुऊन काढून फिरदौसी आणि हाफीज सादीची ही भाषा सन्मानानं इराणमध्ये पुन्हा दरबारी थाटानं सजवली.'
¤

सर्फराझकडून रेझा शहाच्या हकीकती ऐकताना मनात अनेक प्रश्नांचं काहूर उठत होतं. आपल्या जुन्या संस्कृतीचा—धर्माचा नव्हे—अभिमान धरून देश आधुनिक बनविण्याचा प्रयत्न करणारा हा रेझा शहा—राष्ट्रभाषेमधील इस्लामपाठोपाठ घुसलेले अरेबिक शब्द निवडून भाषा शुद्ध करणारा हा शहेनशहा आणि ऑक्सफर्ड इंग्रजीचं वेड असलेले आम्ही!

उर्दूसाठी जीव टाकणाऱ्याबद्दल तर काय म्हणावं असा प्रश्न मला इराण भटकताना वारंवार पडायचा. उर्दगाह म्हणजे छावणी-सैन्याचा तळ. मध्यपूर्वेतील तुर्की वंशाच्या बाबरनं जेव्हा हिंदुस्थानात मोगल राज्य स्थापलं तेव्हा फार्सी ही दरबारी आणि सरकारी कामकाजाची भाषा झाली. सैनिकी छावण्यात फार्सी बोलणारे अफघान, मंगोल आणि हिंदी भाषिक ह्यांच्या देवाणघेवाणीतून कामचलाऊ भाषा म्हणून उर्दू जन्माला आली. पुढं हिंदुस्थान भंग पावून पाकिस्तानचा जन्म झाला तेव्हा पाकिस्तानमधील मुसलमानांचा 'उर्दू' हा केवळ जिव्हाळ्याचा नाजूक प्रश्न न उरता त्याला धार्मिक स्वरूप प्राप्त झालं. उर्दू बोलताना जास्तीत जास्त फार्सी शब्द वापरणं म्हणजे उच्च दर्जाचं उर्दू अशी भ्रामक समजूत लोकांनी करून घेतली.

वास्तविक हिंदी आणि फार्सीच्या मिश्रणातून उर्दू ही भेसळभाषा निर्माण झाली. इराणमध्ये ज्याप्रमाणे रेझा शहानं फार्सीमध्ये घुसलेले अरेबिक शब्द काढून त्या ठिकाणी नवीन फार्सी प्रतिशब्द योजले त्याप्रमाणे वास्तविक उर्दूचं शुद्धीकरण करावयाचं झाल्यास त्यातील फार्सी आणि फार्सीपासून निर्माण झालेले भेसळ शब्द काढून त्याच्या ठिकाणी सुयोग्य असे संस्कृत भाषेच्या आधारावर नवीन सोपे शब्द नको का तयार करायला?

इंग्रजी भाषेत राज्यकारभार चालविणाऱ्या आम्हाला हा विचार कधी काळी पटणार आहे का? उर्दूचं शुद्धीकरण म्हणजे हिंदुधर्माचं इस्लामवर आक्रमण अशी काही तरी खुळचट समजूत करून सर्वच भाषा अशुद्ध बोलत, अशुद्ध विचारसरणी उराशी घट्ट धरून ठेवत आम्ही भट्टब्राह्मण, मुल्लामौलवी किंवा बिशप-पाद्री आम्हाला हाकतील त्याप्रमाणेच चालत राहणार काय? (क्रमशः)

# Art Buchwald Stops Here

By Art Buchwald

माझ्या 'माणूस' मधील २१।६।१९८० च्या अंकात 'एका ग्रंथपालाचा कॅथार्सिस' या लेखाविषयी मला काही पत्रे आली. ६ जुलै १९८० च्या 'सोबत' मध्येही श्री. अनिल थत्ते यांनी या लेखाविषयी चांगला उल्लेख केला होता.

मला आलेल्या पत्रात श्री. वसंत गणेश जावडेकर, कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, कुर्ला शाखा याचे पत्र उल्लेखनीय व बोलके वाटले. त्याचे काही वाचक पावसाळ्यात प्लॅस्टिकच्या व इतर वॉटरप्रुफ पिशव्यानी पुस्तकाला संरक्षण देण्याऐवजी स्वतःच्या डोक्यावर पाणी पडू नये म्हणून उघडे पुस्तकच डोक्याच्या सरक्षरासाठी वापरतात ! आता ही गोष्ट मीसुद्धा अनेक वेळा पाहिली आहे. (मी मात्र माझ्या मेंबर्सना असे करताना कधीच पाहिले नाही. माझे बरेचसे मेंबर्स संपूर्ण सहकार्य देणारे आहेत हे मी नमूद करू इच्छितो आणि एक दिवस मी चांगल्या मेंबर्सबद्दलही लिहीन. कित्येक वर्गणीदार तर लांबून निव्वळ त्याच तारखेला पैसे भरण्यासाठी येतात, तर कित्येक डब्बल पिशव्यातून पुस्तके आणतात ! माझे काही मेंबर्स तर कधीकधी कात्रणे सुद्धा आणून देतात.)

मी फर्ग्युसन कॉलेजच्या एका गल्लीत रहात असल्यामुळे पुस्तके ने-आण करणारे अनेक प्रकारचे रंगी-बेरंगी व चित्रविचित्र पोषाखवाले विद्यार्थी मला रोज दिसतात. या विद्यार्थ्यांचं मुसमुसलेलं तारुण्य बघून आपल्यात नवचैतन्य जरूर निर्माण होतं; पण पावसात हे विद्यार्थी जेव्हा पुस्तके डोक्यावर धरतात किंवा हिरवळीवर बसण्यासाठी त्यावर धष्टपुष्ट Fanny ठेवतात तेव्हा मात्र त्यांच्या थोबाडीत मारावीशी वाटते !

श्री. जावडेकरांनी ग्रंथालयात हजारो पुस्तकाचे एक ठोकळेबाज बाइंडिंग डोळ्याला सुख देत नाही अशीही एक मार्मिक ओळ पत्रात लिहिली होती. एकसारख्या बाइंडिंगमुळे पुस्तकानी युनिफॉर्म घातल्यासारखा वाटतो हे अगदी खरे आहे. त्यामुळेच मी मला पुस्तक ज्या स्वरूपात मिळेल त्या स्वरूपातच व त्याच जॅकेटमध्ये त्याचे व्यक्तिमत्त्व टिकवण्याचा प्रयत्न करतो.

मुलं अगदी शाळेत शिकायला लागल्यापासून त्याचा पुस्तकांशी संबंध येतो तो मरेपर्यंत टिकतो. त्यामुळे शाळेतच ग्रथ कसे हाताळावे असे दोन-चार धडे चित्रासह टाकून दिले तर फार उत्तम होईल. Catch them young !

या कटकटीच्या जीवनात श्री. आर्ट बुकवाल्डची पुस्तके वाचायला बरी वाटतात. अलीकडे श्री. बुकवाल्डचे विचार सारखे म्हणे 'क्लोनिंग' या विषयाकडे वळतात. अमेरिकेतील एका टायकूनला त्याच्या लायकीचा वारस हवा होता. त्याच्या जनुकावर (genes) त्याचा विश्वास होता, पण कोणत्याच बाईची (म्हणजे त्याला मिळणाऱ्या !) जनुक त्याला पसंत नव्हती ! मग या श्रीमंताने एक वैज्ञानिक भाड्याने ठेवला. वैज्ञानिकाने टायकूनच्या शरीरातील काही पेशी काढल्या व त्या पेशीना कोणी एका बाईने 'ऊब' दिली. मग त्या वैज्ञानिकाने या गोळा झालेल्या मटेरियलमधून बाईचे सर्वच्या सर्व आनुवंशिक गुणदोष त्यातून साफ धुऊन टाकले आणि अगदी टायकूनसारखाच एक माणूस तयार केला. या तऱ्हेने एका माणसाच्या पेशीतून असंख्य माणसे निर्माण करतात त्यालाच क्लोनिंग (Cloning) म्हणतात, हे सर्वांना माहीत आहेच. वर वर्णन केलेल्या घटनाचे एक खरंच Non-fiction बेस्टसेलर बाजारात आले आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे 'In His Image' ते रॉरविक नावाच्या माणसाने लिहिले आहे. मी ते वाचनालयात घेतलेही आहे या पुस्तकाबद्दल अमेरिकेत बरीच खळबळ उडाली होती. काही म्हणाले, 'ते खरं आहे.' तर काही म्हणाले, 'हे सर्व कुक्ड-अप !'

असे काही झाले की श्री. बुकवाल्ड एकदम चिंतेत पडतात. बुकवाल्डना वाटते की, त्याच्यासारखे एक हजार बुकवाल्ड केले तर काही बिघडणार नाही. कारण दुनियेला बुकवाल्डची फार गरज आहे असे ते म्हणतात ! पण बुकवाल्ड यांच्या शेजारी एक कॉडस्मॅथर नावाचे गृहस्थ रहातात. ते कधी स्वतःची गाडी धूत नाहीत. त्याचा कुत्रा नेहमीच शेजाऱ्याना त्रास देत असतो. त्याची मुलं तर रस्त्याच्या मधोमध स्केटिंग करतात. त्यांच्या बॅकयार्डमध्ये तर एवढ्या Gin च्या बाटल्या आहेत की, तो त्यात पोहतो की काय असे वाटते ! या कॉडस्मॅथरची जनुके नीट नाहीत. न करे नारायण आणि भविष्यात जर स्वस्तात क्लोनिंग व्हायला लागले आणि समजा असे हजार कॉडस्मॅथर एकदम निर्माण झाले तर श्री कॉडस्मॅथरच्या जवळील आसमंत स्मशानच होऊन जाईल ! मधेच गाडी पार्क करणे, शिवीगाळ करणे, फालतू कारणांवरून भांडण उकरून काढणे असे कॉडस्मॅथरसारखे शेजारी भेटले की जीव नकोसा होतो. त्यापेक्षा हजार 'फिनिक्स'चे संचालक क्लीन झाले की hey Presto ! हजार 'फिनिक्स' लायब्ररया ! एक गाव एक पाणवठाप्रमाणे एक टाउन, एक फिनिक्स !

आर्ट बुकवाल्डच्या कुटुंबात फार चिंतेचे विषय घुसले की ते त्या विषयाची विभागणी करतात. 'सौ. तू प्रदूषण या विषयाची चिंता कर ! 'ज्युनियर चि. तू आता अमेरिकेच्या फॉरिन पॉलिसीची चिंता कर ! 'सिनियर चि. तू कमी होत जाणाऱ्या पेट्रोलच्या साठ्याची चिंता कर !' ही अशी चिंतेची डिव्हिजन झाली की एका माणसालाच अल्सर होणार नाही !

झाला कॉडस्मॅथरचं झालं. त्यापुढे बुकवाल्ड सारा ली चं उदाहरण देतात. काय सडसडीत बांधा व सौंदर्य ! एकदा पाहिली की शरीरातील ब्लड सेल्स थयथय नाचायला लागतात ! अशा हजारो सारा ली क्लोन केल्या तर ! सर्वांना एक एक मिळेल (म्हणजे बायकोव्यतिरिक्त) असे बुकवाल्ड म्हणतात ! म्हणून असे वाटते की या

क्लोनिंगमुळे एका वेगळयाच विश्वात आपण प्रवेश करणार आहोत.

बुकवाल्ड पुढे असेही म्हणतात की, एकदा का क्लोनिंग ही *in-thing, trendy* झाली की टीन एजर्स आपले अनेक 'स्व' निर्माण करतील व पालक पटकी झाल्यासारखे मरायला लागतील. कारण कोणता पालक एकापेक्षा जास्त टीन-एजर सहन करू शकेल ?

बुकवाल्डना वाटते सुरुवातीला फक्त ऑइल व गॅस टायकूनच स्वतःचे क्लोनिंग करू शकतील. कारण क्लोनिंग करणे आत्ता तरी इतके महाग आहे की ते दुसऱ्या कुणाला परवडणार नाही. मग हे टायकून्स तेलाचे भाव वर नेतील. कारण ते म्हणतील 'There are so many mouths to feed now.' (!!) मग आपल्या मुंबईत जिकडे तिकडे अरबांचे Fez व पांढरी उडणारी फडकी दिसायला लागतील. जसलोक आणि इतर हॉस्पिटलमध्ये, हॉटेलमध्ये जागा नाही म्हणून अरब लोक रहातात. क्लोनिंगमुळे मग जे थोडेफार पेशन्ट आहेत त्याना सुद्धा जागा मिळणार नाही !

यानंतर बुकवाल्ड आपल्याला अंतर्मुख व्हायला सागतात. खरच तुम्हाला तुमची स्थळप्रत हवी आहे का ? मानवाच्या हितासाठी त्यांची जरुरी आहे का ? अशा ऱ्हेटॉरिकचा आश्रय घेऊन बुकवाल्ड म्हणतात की, क्लोनिंग करणाऱ्यांनी आपल्या पेशीचे अॅबॉर्शन घडवून आणावे. आता अॅबॉर्शन ही स्त्रियांची मक्तेदारी रहाणार नाही !

क्लोनिंग हे पौराणिक काळातही प्रचलित होते असे डॉ. वर्तक किंवा इतर भारतीय व्हॉन डॅनिकेन म्हणतील. देवी दुर्गेने जेव्हा रक्तबीजाला मारले तेव्हा एक एक थेंबातून एक एक रक्तबीज निर्माण झाला होता. हे एक प्रकारचे क्लोनिंगच नव्हे काय ? मायथॉलॉजिकल क्लोनिंग !

'माणूस'मध्ये आधी सांगितल्याप्रमाणे बुकवाल्ड कोणतीही करंट ज्वलंत समस्या घेतात व त्याचे वाभाडेच काढून टाकतात. आपल्यालाही इतके हसू येते की त्या भयावह समस्येतील नागीच निघून जाते !

—जे. एन्. पोंडा

☐

## पुणे वार्ता

### शंभर वर्षांपूर्वीची

# लाला दीनदयाळ यांची छायाचित्रे

गेल्या आठवडयात (दि. १० ते १६ ऑगस्ट) फोटोग्राफीसंबंधीची पुण्यातील दोन प्रदर्शने पाहण्याचा योग आला. एक होत बालगंधर्व रंगमंदिरात तर दुसरं टिळक स्मारकमध्ये. बालगंधर्वमधलं प्रदर्शन फोटोग्राफीविषयीचं होतं-कै लाला दीनदयाळ या अद्वितीय फोटोग्राफरने काढलेल्या सुमारे ७०-८० वर्षांपूर्वीच्या फोटोचं. टिळकस्मारकमधलं प्रदर्शन महाराष्ट्रातल्या काही परिचित आणि बऱ्याचशा अपरिचित किल्ल्यांच्या छायाचित्रांचं होतं.

कै. लाला दीनदयाळ याच्या छायाचित्राचं प्रदर्शन यापूर्वी मुंबईत भरलेलं होत. त्याची चर्चाही त्या वेळी बरीच झाली होती. या छायाचित्राबद्दल, त्याचा दर्जा, विषय याबद्दल थोडीशी माहिती होती आणि उत्सुकता सुद्धा. कै. दीनदयाळ तसे दरबारी फोटोग्राफर होते. त्याच्या कलेला अगदी सुरुवातीलाच राजमान्यता मिळाली. ब्रिटिश साम्राज्यावर जेव्हा सूर्य मावळत नसे त्या वेळेला आणि राणी व्हिक्टोरिया सम्राज्ञी होती तेव्हा तिने दीनदयाळना दरबारी फोटोग्राफर म्हणून नियुक्त केलं होत. राणी व्हिक्टोरियाची ती राजाज्ञा सुद्धा जतन करून प्रदर्शनात ठेवलेली आहे. हैद्राबादच्या ६ व्या, निजामांनी कै. लाला दीनदयाळ याना आपल्या पदरी ठेवून घेतलं. एवढंच नाही तर त्याना 'राजा मुसावीरजंग' हा किताबही बहाल केला आणि मासिक तनखा मंजूर केला. निजामानी दीनदयाळांच्या कलेला प्रोत्साहन दिलंच तसंच त्याची योग्य ती कदरही केली.

लाला दीनदयाळची छायाचित्रे अनेक विषयांवरची आहेत. वेगवेगळया काळात घेतलेली. एका परीनं हे प्रदर्शन म्हणजे गेल्या सुमारे १०० वर्षांतील इतिहासाचा, ऐतिहासिक घटनांचा, सामाजिक बदलाचा आणि जुन्या रूढी परंपराचा धावता परिचयच आहे. या छायाचित्राचे विषयही विविध आहेत. त्यात आपल्या रोजच्या व्यवहारातील घडामोडीचे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे चित्रणही आहेत.

सध्या हे प्रदर्शन आपल्या पुण्यात भरलेलं असल्यानं पुण्यातील काही वास्तूचे, स्थळांचे फोटोही त्यात प्रामुख्यानं ठेवलेले आहेत. ही सर्व छायाचित्रं साधारण ८० ते ९० वर्षांपूर्वीची आहेत. तरीही त्याचा दर्जा, त्यातील चित्रण अगदी आजच काढलेल्या छायाचित्रांइतकं सुंदर, स्वच्छ आणि स्पष्ट आहे. पुण्यातील छायाचित्रांमध्ये शनिवारवाडयाचा दिल्लीदरवाजाकडून घेतलेला दर्शनी भाग आहे. काही दिवसापूर्वी चर्चेचा विषय झालेल्या पेशव्याच्या विश्रामबागवाडयाचे छायाचित्र आहे त्याचे सुंदर लाकडी नक्षीकाम सुद्धा लक्षात राहतं. याच्या जोडीला चटकन ओळखू न येणाऱ्या वास्तूची छायाचित्रंही आहेत. यातली दोन देवळं तर जवळजवळ आपल्या सर्वांच्याच परिचयाची आहेत. एक म्हणजे मंडईतलं रामेश्वराचं आणि दुसरं पर्वतीवरील देवदेवेश्वराचं. ही देवळं लक्षात झटकन येत नाहीत. कारण रामेश्वराचा ८०-९० वर्षांपूर्वीचा परिसर तुम्हा-आम्हाला-'आजच्या' लोकाना कसा कळणार ?

अशा ऐतिहासिक स्थळांबरोबरच त्या वेळच्या बदलत्या पुण्याची छायाचित्रंही त्यात आहेत. अगदी बाल्यावस्थेतलं ससून हॉस्पिटल, पुण्याचा कौन्सिल हॉल, सध्याचं इंजिनिअरिंग कॉलेज सुरुवातीला ज्या कॉलेज ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग स्वरूपात होतं ते आहे, आता जगभर माहिती असलेलं 'डेक्कन कॉलेज' सुद्धा !

पुण्यातल्या सामाजिक बदलाबद्दलच म्हणाल तर एका छायाचित्रात एक ब्राह्मण

अगदी टोऱ्यात बसलेला दिसतो – तर इंग्र. जाच्या प्रोत्साहनाने निर्माण झालेली आणि वाढलेली एम्प्रेस गार्डन आहे. तसंच बंडगार्डन आहे आणि त्या वेळी असलेला त्यातला बँड-स्टँडही आहे. जशी पुण्याची छायाचित्रे आहेत तशीच मुंबई, हैद्राबाद, कलकत्ता याचीही आहेत. हे प्रदर्शन म्हणजे गतकाळा-कडे, सुमारे १०० वर्षांपूर्वीच्या भारताकडे, त्याच्या राजकीय, सामाजिक, ऐतिहासिक अशा विविध पैलूकडे बघता येणारी, इतिहासात हळूच डोकावू देणारी छोटीशी खिडकीच जणू !

आपल्या राजवैभवाचं प्रदर्शन करणारे भारतातले प्रमुख संस्थानिक आहेत. हैद्रा-बादचे निजाम, ग्वाल्हेरचे महाराजा, म्हैसूरचे महाराज कृष्णराज वडियार या प्रदर्शनात दिसतात. ब्रिटिश मडळीपैकी लॉर्ड कर्झन, लॉर्ड किचनेर आणि वेगवेगळ्या प्रसंगी घेतलेली पंचम जॉर्ज यांची छायाचित्रं आहेत. पंचम जॉर्जची शाही शिकारही आपल्याला दिसते. या राजेराजवाड्याबरोबरच आपल्या अनेक महत्त्वाच्या सास्कृतिक आणि पारं-पारिक प्रसंगांची सुद्धा अनेक छायाचित्रे लाला दीनदयाळांनी टिपली आहेत. सन १९०० मध्ये मुंबईच्या एका जोशी नावाच्या गृहस्थानी लाला दीनदयाळाकडून आपल्या घरच्या मंगळागौरीला खास छायाचित्रे काढून घेतली होती. या छायाचित्रात सागर-गोट्यातील एखई, दुखई टिपली आहे, तर काही छायाचित्रात रात्र जागवायची म्हणून खेळले जाणारे छोटे खेळ आहेत. झिम्मा, किकिच पान बाई कीकी आणि पिंगा-बाई पिंगामुद्धा आहे. खास बैठ्या खेळातील गंजिफा, सारीपाट हे खेळ, खेळणाऱ्या स्त्रिया आहेत. त्या वेळी सणाप्रसंगी केल्या जाणाऱ्या केशभूषाची सुद्धा छायाचित्रे आहेत. खोपा, सुरमा अशा केशभूषा केलेल्या स्त्रिया आहेत.

या छायाचित्राचं दुसरं महत्त्व म्हणजे यामध्ये सहजच त्या वेळच्या बालविवाहाच्या प्रथेचं दर्शन घडतं. मंगळागौरीच्या खेळातल्या सर्व स्त्रियांचा वेष, नऊवारी लुगडी हे सागतात.

इतक्या विविध विषयांची उत्कृष्ट छाया-चित्रं एकाच कलावंतानं आपल्या छायाचित्र-कलेच्या सुमारे ३५-४० वर्षांच्या कालावधीत काढली. एक प्रकारे सुदर, अव्वल दर्जाची छायाचित्रकला हेच लाला दीनदयाळ यांचं जीवन होतं. वस्तुत. व्यवसायानं सिव्हिल इंजि-निअर असा हा माणूस. सुरुवातीला उत्सुकता म्हणून छायाचित्रकलेकडे वळला. अगदी थोड्याच अवधीत ते चीफ सिव्हिल ड्राफ्टस्मन या पदाला पोहोचले; पण त्यांचा खरा जीव छायाचित्रकलेत गुतला होता. १८७४ मध्ये वयाच्या तिसाव्या वर्षी या माणसाने इंजिनिअरिंगमधली नोकरी सोडली आणि चक्क छायाचित्रकलेला वाहून घेतलं. ज्या काळात संध्याकाळनतर फक्त मशालीचा उजेड असे, जेव्हा फोटोग्राफी सुद्धा बाल्या-वस्थेत होती, त्या काळात उत्कृष्ट फोटोचा लाला दीनदयाळांनी ध्यास घेतला आणि त्या कलेवर प्रभुत्व मिळवलं.

## उच्च दर्जा, चौफेर चित्रण

दीनदयाळाच्या छायाचित्रकलेचा दर्जाच इतका उच्च होता की त्यांच्या नावाची प्रसिद्धी होण्यास फार वेळ लागलाच नाही. दीनदयाळाकडून फोटो काढून घेण्याची स्पर्धाच सुरू झाली. संस्थानिक, ब्रिटिश गव्हर्नर्स हा मानच समजू लागले. याचाच परिणाम म्हणून राणी व्हिक्टोरियानं कै. लाला दीनदयाळाना आपले दरबारी छाया-चित्रकार म्हणून नियुक्त केलं. पंचम जॉर्ज, लॉर्ड डफरिन, लॉर्ड किचनेरपासून हैद्राबादच्या निझामापर्यंत सर्व राजे रजवाड्याचे फोटो दीनदयाळानी काढले; त्याचं वैभव, ऐश्वर्य, समृद्धी त्यांनी टिपली. याबरोबरच त्यांनी गुरुदेव रवींद्रनाथ, जमशेटजी टाटा, जमशेटजी जीजीभॉय याचीही पोर्ट्रेट्स् घेतली.

दीनदयाळाची कला राजसेवेपुरती मर्या-दित राहिली नाही. त्यानी भारतभर भ्रमण केलं. व्यवसायानिमित्त ज्या ज्या ठिकाणी ते गेले तिथलं चित्रण त्यानी केलं. त्यांच्या दृष्टीला जे जे जाणवलं ते ते त्यानी जिवंतपणे टिपलेलं आहे. मग तो दिल्लीचा शाही दीवाण–ई–खास असो अथवा १८९६ चा दुष्काळ असो.

आपली शिल्पकला, वास्तुशास्त्र जग-प्रसिद्ध आहेच. या प्रसिद्ध कलेचे नमुने असलेल्या अनेक मंदिराची, शिल्पाची छाया-चित्रं दीनदयाळानी काढली. साचीचा स्तूप, कार्ल्याची लेणी, मुंबईजवळील एलिफंटाची त्रिमूर्ति, चितोडचा विजयस्तंभ, खजुराहो, महाबलीपुरम् आणि अजिंठा–वेरूळसुद्धा ! आपल्या छायाचित्रकलेच्या वेडापायी हा गृहस्थ किती फिरला असेल बघा ! यात कलकत्त्याची 'चौरंगी' आहे. मुंबईचं व्हिक्टोरिया टर्मिनस्, पुण्याचा शनिवारवाडा, बनारसचे घाट, इंदोरची क्षिप्रानदी, तंजा-वरची देवळं आहेत.

कै. दीनदयाळ यांच्याबद्दल या छायाचित्र-प्रदर्शनापलीकडे माहिती करून घेण्याची इच्छा होती. काही नवीन कळलं तर बघावं म्हणून त्याचे नातू श्री. अमीचंद यांना भेटलो. जवळपास सत्तरीच्या वयाचे अमी-चंदही स्वत: उत्कृष्ट छायाचित्रकार आहेत. लंडनच्या रॉयल फोटोग्राफिक सोसायटीचे ते सदस्य आहेत. दीनदयाळांची छायाचित्रकलेची परपरा त्यांनी जतन केली आहे आणि वाढवलीही आहे. अमीचंद स्वत: १९२० पासून छायाचित्रणाच्या व्यवसायात आहेत. आजही सिकंदराबादला त्याचा स्टुडिओ आहे निजामांनी त्यांनाही 'स्टेट फोटो-ग्राफर' म्हणून नियुक्त केलं होतं.

अमीचंदना मी विचारलं की 'आपल्या-कडचे हे फोटो, इतक्या अव्वलदर्जाचे फोटो-एकदम लंडनमध्ये कसे काय प्रसिद्धीला आले?

अमीचंद म्हणाले की, पुण्यात जसं त्यानी प्रदर्शन भरवलंय तसं लडनमध्ये भरवलं नव्हतं. अमेरिकेतील एक रिसर्च स्कॉलर प्रो. क्लार्क वॉस्विक (Prof. Clark Worswick) यानी Princly India नावाचं एक पुस्तक लिहिलंय. या पुस्तकात दीनदयाळाची अनेक छायाचित्रं त्यानी वापरली आहेत, तर या पुस्तकासाठी वापरण्यात आलेल्या छायाचित्रांपैकी काही १५–२० छायाचित्राचं अगदी छोटं प्रदर्शन त्यांनीच लंडनला भरवलं होतं. ही चित्रंच इतकी चागली आहेत की, लंडन टाइम्सनं त्यावर एक लेखही आपल्या ४-१२-७७ च्या अंकात प्रसिद्ध केला. यातील काही छायाचित्रं १९७९ च्या 'फोटोग्राफिक ॲन्युअल' यामध्ये प्रसिद्ध झाली आहेत.

अमीचंद स्वत: अव्वलदर्जाचे छायाचित्रकार असल्याने त्याना मी विचारलं, की ही सर्व छायाचित्रं जुनी असूनही, तसंच ज्या काळात चित्र घेतली गेली त्या वेळी–विशेष रसायन वगैरे नसताना ही इतकी चागली कशी ?

–अमीचंदानी सागितलं की, चित्रासाठी लागणारी सर्व रसायनं वगैरे कै. दीनदयाळ स्वतः तयार करत; त्यांनी आपला एक खास 'फॉर्म्युला 'च तयार केला होता. दुसरं म्हणजे या फोटोसाठी लागणारी निगेटिव्ह प्लेट (त्या वेळी काच वापरली जात असे.) सुद्धा दीनदयाळच तयार करत असत. त्यामुळे त्यांचा दर्जा उत्कृष्ट असे. पुढे त्यानी सागितलं की, दीनदयाळ फोटो धुताना खूप वेळ शुद्ध पाण्यात धुवत असत. ( शुद्ध हा शब्द इथे unpolluted या अर्थी वापरला आहे ) पाण्यात कोणतीही रसायनं नसल्यानं चित्राचा दर्जा चागला आहे.

## वारसा जपणार कसा ?

एका प्रश्नाला उत्तर देताना अमीचंदनी सांगितलं की, प्रदर्शनातील सर्व फोटो त्यानी आणि त्याच्या कुटुंबियानी जपलेले आहेत. आपला अमूल्य वारसा म्हणून. अमीचंद याचे चिरंजीव श्री. प्रभाशचद हे सुद्धा त्याच्याबरोबर होते. ते म्हणाले की, आज हे फोटो, निगेटिव्हज् चागल्या अवस्थेत आहेत, याला प्रामुख्यानं अमीचंद कारणीभूत आहेत. आपल्या जिवापलीकडे त्यानी हे फोटो जपले आहेत. काही खराब झालेल्या फोटोच्या कॉपीज् काढून ठेवल्या आहेत. काही जुन्या ग्लास प्लेटस् सुद्धा त्यांनी बेमालूम जोडल्या !

अमीचंद म्हणाले की, या फोटोंबद्दल लोकांच्या मनात आता खूपच कुतूहल निर्माण झालं आहे. तसंच लंडनला गाजलेले फोटो सुद्धा कै. दीनदयाळ यांचेच होते हे लोकांना समजावं म्हणून सर्व महत्त्वाच्या शहरात ते हे प्रदर्शन भरवणार आहेत. यासाठी ग्रिंडलेज बँकेनं त्याना सहाय्य देऊ केलं आहे; यानंतर आता हे प्रदर्शन दिल्लीला भरणार आहे.

ही सर्व छायाचित्रं फोटोग्राफीच्या दृष्टीनं महत्त्वाची आहेतच; पण ऐतिहासिकदृष्ट्यासुद्धा फार महत्त्वाची आहेत; मला वाटलं ही आपल्या 'नॅशनल अर्काईव्हज् 'मध्ये हवीतच. अमीचंदनी सागितलं की, दीनदयाळ दरबारी फोटोग्राफर (State Photographer) असल्याने ऐतिहासिक फोटो या अर्काईव्हज्मध्ये आहेतच; परंतु इतर अनेक फोटो-ज्यात जुन्या काळातील वास्तूचं, स्थळाचं चित्रण आहे, असे फोटो मात्र फक्त त्याच्या स्वतःकडेच आहेत.

सध्या त्याना कोणतंही सरकारी सहाय्य मिळत नाही. हैद्राबादमधल्या बहुतेक सरकारी समारंभांचं आमंत्रण मात्र आवर्जून येतं.

अमीचंदांप्रमाणेच या प्रदर्शनाच्या संयोजिका सौ. हेमलता जैन यांच्याशीही मी बोललो त्या स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या एम. ए. आहेत. त्यांचा या फोटोकडे बघण्याचा दृष्टिकोन एक महत्त्वाचा ठेवा असाच आहे. त्यांचा खरा प्रयत्न आहे तो हा अमोल ठेवा जतन कसा करता येईल, हा एवढा प्रचंड संग्रह–ज्याला ऐतिहासिक महत्त्व आहे तो उत्तम स्थितीत ठेवणं, हे एखाद्या कुटुंबाच्या शक्तीच्या बाहेरचं आहे लोकाना ह्या फोटोंचं महत्त्व समजल्यावर त्याच्या सहाय्याची त्यांना अपेक्षा आहे.

दुसरा त्यांचा विचार म्हणजे कै. दीनदयाळ यांचे चागले (खर तर सर्वच) फोटो ज्यात आहेत असं एक पुस्तकच प्रसिद्ध करायचं. त्याला थोडंसं चरित्रपर स्वरूपही देता येईल. त्या म्हणाल्या की, आता शिल्लक असलेले सुमारे २००० फोटोग्राफस् काळजीपूर्वक जतन करणं आवश्यक आहे, जुन्या प्लेटस स्वच्छ करून त्या परत खराब होऊ नयेत असं पाहणं जरूर आहे. यासाठी बरंच आर्थिक साहाय्य जरूर आहे सौ. जैन म्हणाल्या की, त्याना खरा आनंद लोकाच्याकडून मिळतो. प्रदर्शन बघायला येणारे प्रेक्षक जे लिहून जातात, त्याना जो आनंद मिळतो तोच खरं समाधान देतो.

या फोटोचं संग्रहालय करण्याची जी कल्पना आहे त्यासाठी लागणाऱ्या पैशांसाठी या फोटोच्या कॉपीज विक्रीसाठी ठेवल्या होत्या; पण दुर्दैवानं त्या दृष्टीनं त्याना फारसा प्रतिसाद मिळालेला नाही. पुण्यातल्या जुन्या फोटोच्या कॉपीज, पुण्यातील काही नामवंत संस्था अथवा उद्योगसमूह विकत घेऊन अथवा इतर मार्गांनी काही आर्थिक साहाय्य करतील ही अपेक्षा फोल ठरली आहे, याबद्दल मात्र वाईट वाटते.

या दृष्टीनं कोणत्याही केंद्रीय अथवा राज्यसरकारनं त्यांना अजून साहाय्य दिलेलं नाही. एक चांगली गोष्ट म्हणजे डॉ. मुल्कराज आनंदासारख्या कलेतील जाणकारांनी या छायाचित्रामध्ये रस घेतला आहे. त्यांच्या प्रयत्नानी या छायाचित्राचं चांगल जतन होईल अशी आशा आहे.

◻

'यूथ होस्टेल्स् असोसिएशन ऑफ इंडिया 'च्या पुणे शाखेच्या वतीने टिळक स्मारक मंदिरात महाराष्ट्रातील काही किल्ल्याच्या छायाचित्राचं प्रदर्शनही या आठवड्यात भरलं होतं. 'यूथ होस्टेल्स असोसिएशन ऑफ इंडिया ' ही संस्था युवक वर्गात (त्यांच्या म्हणण्यानुसार १६ ते ४० वर्ष गटातील) गिरिभ्रमण, मुक्तभ्रमण, सायकल-मोटारसायकलच्या सफरी याविषयी आवड निर्माण करण्याचं, तसंच असे कार्यक्रम आयोजित करण्याचं कार्य करते. काही दिवसापूर्वी त्यांनी काश्मीरमध्ये असाच एक ट्रेकिंगचा कार्यक्रम आयोजित केला होता.

या तरुण मंडळीनी–आपल्या कार्यक्रमाचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील किल्ल्यांबद्दलचं हे प्रदर्शन भरवलं होतं. प्रदर्शनात साधारण २-३ छायाचित्रामध्ये एका किल्ल्याबद्दल माहिती दिली होती. त्या किल्ल्यावरून घेतलेल्या चित्रणाचे काही फोटोही त्यात होते.

आता किल्ले म्हणलं म्हणजे रायगड, राजगड, शिवनेरी आलेच. रायगडावरची शिवप्रभूंची समाधी, राजगडाचा दुर्गम बालेकिल्ला फोटोत आहेच. रायगडचं जीव दडपवणार टकमकटोकसुद्धा टिपलेलं आहे. आपल्याला निदान ऐकून तरी माहिती असलेल्या किल्ल्याबरोबरच हरिश्चंद्रगड, रावणगड, बहादूरगड, लिंगाणा यासारख्या फारशा परिचित नसलेल्या किल्ल्यांची छायाचित्रंही प्रदर्शनात लावली होती.

या प्रदर्शनाचं वेगळंपण म्हणजे नुसते फोटो लावून ही मंडळी थाबली नाहीत. एखाद्या किल्ल्यावर कसं जायचं, कोणत्या मार्गांनी तिथं जाता येतं, तेही ती सागतात. काही ठिकाणी पायी कस जाता येईल याबद्दलचे, तसेच हे किल्ले नेमके कोठे आहेत हे दाखवणारे नकाशे, रेखाचित्रं या फोटोबरोबरच माडली होती. उत्साही मंडळी असतील तर ४-५ दिवसाच्या ट्रेकिंगमध्ये ५ ६ गड कसे 'सर' करता येतील हे दाखवणारे नकाशेही प्रदर्शनात दिसले.

एकूण किल्ले म्हटलं की, 'शिवाजी महाराज की जय' म्हणण्यापलीकडे ज्याना रस आहे, काही करायची, फिरण्याची इच्छा आहे त्याना हे प्रदर्शन जरूर उपयुक्त वाटलं असेल.

या वर्षी आपण महाराजांची ३०० वी पुण्यतिथी आणि ३५० वी जयंती साजरी करतो आहोत. यानिमित्त भर पावसात साहस सफर करायची असेल तर हे प्रदर्शन अशांना वरदानच होतं!

–राजीव पळसुले

–बाबु उडुपी

## हिचकॉकच्या कथा । कथा आठवी

## स्वैर अनुवाद : रवींद्र गुर्जर

# छांदिष्ट !

मी हॉटेलमधून बाहेर पडलो, तेव्हा रात्रीचे दहा वाजून गेले होते. हवेत ऊब होती. मला ड्रिंक घ्यावसं वाटलं. जवळपासचे सगळे बार तुडुंब भरले असणार, याची मला खात्री होती. असल्या गर्दीत जायला मला फारसं आवडत नाही. त्यातून रग्बी खेळाच्या स्पर्धा शहरात चालू होत्या. म्हणजे विचारायलाच नको.

वाटेत लोकांचे थवेच्या थवे दिसत होते. सगळ्यांनाच मद्य हवं असणार. बहुतेकांच्या खांद्यावर रग्बीचा बॉल ठेवलेल्या बॅगा होत्या. मी शांत विभागाकडे जाऊ लागलो. माझ्याही खांद्यावर तसलीच बॅग होती. ती बरीच जड असल्यामुळं खरं म्हणजे मी रेल्वे-स्टेशनच्या क्लोकरूममध्ये ती ठेवून देणार होतो; पण त्याआधी मला ड्रिंकची निकड वाटू लागली.

शेवटी मला हवी तशी जागा सापडली. तिथलं वातावरण कुबट होतं; पण गर्दी काहीच नव्हती. जवळजवळ कुणीच नव्हतं म्हणा ना! बारमन रेडिओला कान लावून खेळाची कॉमेंट्री ऐकण्यात दंग झाला होता.

मी दाराजवळच्या एका खुर्चीवर बसलो. जवळच असलेल्या स्टुलावर माझी बॅग ठेवली. तिथूनच मी एका बियरची मागणी केली. 'एक बाटली इथं आणून ठेव म्हणजे मी तुला पुन्हा त्रास देणार नाही!' बारमनला मी म्हणालो.

माझ्या टेबलावर बाटली ठेवून तो परत जात असताना दुसरं एक गिऱ्हाईक आलं.

'डबल स्कॉच. सोडाबिडा काही नको !'

मी वर पाहिलं. तो इसम चाळिशीतला होता. शरीर बळकट, डोक्याला टक्कल आणि कपाळावर आठ्यांचं जाळं. मीही जवळजवळ तसाच होतो. त्याच्याजवळसुद्धा बॅग होतीच. तो अतिशय दक्षता घेतल्याप्रमाणे खाली बसला.

डोकं मागं नेऊन त्यानं एका दमात व्हिस्कीचा पेला रिकामा केला. 'आणखी असाच भर!' तो म्हणाला 'आणि तो रेडिओ बारीक कर!' त्यानं खिशातून काही नोटा बाहेर काढल्या.

बारमननं चिडून त्याच्याकडं पाहिलं; पण नोटा दिसताच त्याचा चेहरा खुलला. खांदे उडवून त्यानं रेडिओ बारीक केला. जेमतेम त्यालाच ऐकू येईल एवढा. त्या गृहस्थानं जर बियर मागितली असती तर बारमननं त्याचं ऐकलंही नसतं; पण तो स्कॉच मागत होता !

दुसरा पेलाही काही क्षणातच त्यानं रिचवला.

'आणखी एक !' त्यानं मागणी केली.

मी आपला बघत होतो. तिसऱ्या फेरीनंतर त्याची रुंद मान लाल झाली. दोन मिनिटात सहा स्कॉचचे पेग पोटात गेल्यावर चेहऱ्याचे रंग बदलले नाहीत, तरच नवल! त्यामुळं जीभही सैल सुटणार, नक्कीच !

'खेळ खेळतायत साले', तो नवखा इसम उद्गारला 'आणि लोक तासन्‌तास ते ऐकत बसतात, कमाल आहे. काही मूर्ख माणसं किंचाळत उड्या मारतात आणि लक्षावधी मूर्ख ते बघतात किंवा ऐकतात. बेसबॉल काय, फूटबॉल आणि बास्केटबॉल काय! त्यांना काय एवढा आनंद मिळतो देव जाणे!

'प्रत्येकाला काही ना काही छंद हवा असतो', मी म्हणालो.

'हो, पण हे कसले आलेत छंद! एक चेंडू पकडण्यासाठी माकडांची टोळी धावताना पाहून कोण उत्तेजित होईल?' तो त्रासून म्हणाला, 'कोण जिंकतो आणि कोण हरतो याचं लोकांना काहीइतकं महत्त्व वाटत नाही. बरेचसे लोक वेगळ्याच कारणासाठी खेळ बघायला जातात. तुम्ही कधी गेला होता का?'

'एकदा गेलो होतो', मी म्हणालो.

'मग तुम्हाला माझं म्हणणं समजेल. लोकांना आरडाओरडी करायला पाहिजे. हुर्यो, हाणा, पाडा, अंपायरला मारा असं ते किंचाळत असतात. अंपायरला मारा!'

बियर संपवून मी उठू लागलो. तेवढ्यात तो म्हणाला, 'थांबा, आणखी एक घ्या ना! माझ्यातर्फे!'

मी मान हलवली. 'सॉरी, पण मला मध्यरात्रीची गाडी पकडायची आहे.'

त्यानं घड्याळाकडं पाहिलं. 'अजून पुष्कळ वेळ आहे!' त्यानं बारमनला खूण केली. मी निषेध व्यक्त करण्यापूर्वी मद्य ग्लासमध्ये ओतून झालं होतं. अनोळखी माणसाला हा इसम स्कॉच देत होता!

तो पुन्हा बोलू लागला. 'फूटबॉल सगळ्यात वाईट. कित्येकजण त्यात भयंकर जखमी झालेले आहेत; पण लोकांना तेच बघायला आवडतं. खेळाडूंचं रक्त दिसावं, अशी त्यांची सुप्त इच्छा असते. त्यांच्या गर्जना ऐकून पोटात ढवळू लागतं!'

'कोणास ठाऊक!' मी म्हणालो. 'पण माणसातली रानटी प्रवृत्ती बाहेर पडायचा तो निरुपद्रवी उपाय आहे, असं म्हणतात!

'अगदी बरोबर! फक्त ते असं मान्य करीत नाहीत.' त्याचा चेहरा लालबुंद झाला होता. अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या. 'आणि मासे पकडणं किंवा शिकारीचं काय? तिथेही तोच प्रकार. फक्त तुम्ही स्वतः त्यात भाग घेता. मुक्या गरीब प्राण्याला सरळ बंदुकीची गोळी घालतात किंवा गळाला जिवंत आळी लावून मासे पकडतात. त्यातच त्यांना आसुरी आनंद मिळतो. प्रत्येकाला केव्हा ना केव्हा असे खुनशी विचार येतातच. नाकारण्यात अर्थ नाही. बॉक्सिंग, शिकार यात पुरतं समाधान मिळत नाही म्हणून मग युद्धं होतात. तिथे उघड उघड ठार करायला मिळतं. लक्षावधी लोकांना, एकाच वेळी!'

तो निराशावादी गृहस्थ असावा. डबल स्कॉचचाही तो परिणाम होताच. 'मग तुमच्या दृष्टीनं त्यावर तोडगा काय?' आवाजात उपहास शक्यतो येऊ न देता मी

म्हणालो; खुनाविरुद्धचा कायदा त्यांनी रद्द केला तर कमी नुकसान होईल, असं तुम्हाला वाटतं का ?'

'कदाचित ! कोण मेलं यावर हे अवलंबून राहील. समजा तुम्ही गुड, भटके लोक किंवा ज्याना मागे कोणी नाही अशा लोकाना उडवल, तर त्यातून सहज सुटू शकाल. बमालूमपणे !'

मी त्याच्याकडे रोखून बघत म्हणालो, 'असं वाटतं तुम्हाला ?'

त्यानं माझ्याकडं बघितलं नाही. उत्तर देण्यापूर्वी त्यानं आपल्या बॅगकडे दृष्टी टाकली.

'गैरसमज करून घेऊ नका,' तो बळंच हसून म्हणाला. 'मी काही खुनी नाही; पण तस करणाऱ्या एका माणसाची मला आठवण झाली. अगदी याच शहरात, सुमारे वीस वर्षापूर्वी त्यानं धुमाकूळ घातला होता!'

'तुम्हाला तो माहिती होता ?

'छ ! कुणीच त्याला ओळखत नव्हतं. तीच तर गमत आहे. दरवेळी तो सहीसलामत सुटत होता. त्याच्याबद्दल लोकांना बरच माहीत होत. वृत्तपत्रात त्या वेळी खूप छापून यायचं !' त्यान पेय संपवलं.

'त्यानं चार वर्षात तेरा खून केले. पोलिसाना तर वेड लागायची पाळी आली. सुटीच्या दिवशी तो शहरात येतो, असा एक अदाज होता. एकट्या-दुकट्या व्यक्तीला तो बरोबर हेरायचा आणि पेय वगैरे द्यायचं आमिष दाखवायचा. बायकाच्या बाबतीतही तोच प्रकार. नतर सुऱ्यानं तो काम उरकायचा !'

'तुमचं म्हणणं असं की तो सहज गंमत म्हणून हा खळ खळत नव्हता तर त्याला खराखर मनापासून आनंद मिळत होता.'

त्यान मान डोलावली. 'बरोबर. याला खरा छंद म्हणता येईल. माणस कापायला त्याला आवडायचं. त्याचं काय काय कापायला त्याला आवडायचं !' '

मी उभा राहिलो आणि माझ्या बॅगजवळ गेलो. त्याबरोबर दुसरा इसम हसू लागला.

'घाबरू नका!' तो म्हणाला. 'हा गृहस्थ ४० सालापूर्वीच इथून अदृश्य झाला. कदाचित दुसऱ्या महायुद्धात त्यान भाग घतला असावा. तिथे त्याची इच्छा चागलीच पूर्ण झाली असेल—फक्त त्या वेळी खुनी या पदवीऐवजी मोठा हीरो म्हणून त्याचा बहुमान झाला असेल ! माझं म्हणणं आता आलं ना ध्यानात ?'

'हे बघा, माझ्या लक्षात आलं,' मी म्हणालो. 'तुम्ही उगीच उत्तेजित होऊ नका. काही झालं तरी ती तुमची विचारपद्धती आहे.'

त्यानं आवाज खाली केला. 'विचाराची पद्धत ? असेल; पण आज मी स्वत: काय केलं हे तुम्हाला सांगितलं तर गार व्हाल ! मी एकामागून एक पेले संपविले ते उगीच काय ?'

'सगळेच खेळाडू पितात,' मी त्याला सांगितलं. 'पण खेळाबद्दल तुमची अशी मतं असली तर मग तुम्ही स्वत: का खेळता ?'

तो इसम माझ्याजवळ झुकून म्हणाला, 'माणसाला काही ना काही छंद हवाच, नाही तर त्याचं डोकं फिरून जाईल, नाही का ?'

मी काही तरी बोलणार होतो, तेवढ्यात आम्हा दोघानाही कसला तरी आवाज ऐकू आला. दूर कोठे तरी सायरन वाजत होता.

बारमन वर बघून म्हणाला, 'बहुतेक आपल्याकडेच व्हॅन येतीय् !'

टक्कल पडलेला इसम ताडकन् उभा राहिला आणि दाराकडे निघाला.

मी घाईघाईनं त्याच्या मागे गेलो. 'तुमची बॅग विसरली !'

त्यानं मागं पाहिलंच नाही. 'थॅंक्स्,' असं म्हणून तो बॅगसह दिसेनासा झाला.

मुख्य रस्त्यानं न जाता तो दोन इमारतीमधल्या बोळात घुसला होता. मी दारातच उभा असताना पोलिसांची गाडी वेगानं तिथं येऊन उभी राहिली. एक गणवेशधारी सार्जंट मागून धापा टाकत येत होता. त्यानं फूटपाथवर, माझ्याकडे आणि बारकडे शोधक नजर टाकली.

'एखादा जाडजूड, टकल्या इसम कुठ दिसला का ? त्याच्याजवळ एक बॅग होती !' त्यानं विचारलं.

मला खरं सागावंच लागलं. 'अं, होय. एक मिनिटापूर्वीच इथून कुणी तरी असं गेल.'

'कुठल्या बाजूनं ?'

मी मधल्या बोळाकडे खूण केली. त्यानं ओरडून गाडीतल्या पथकाला सूचना दिल्यावर गाडी निघून गेली. सार्जंट मात्र तिथेच थांबला.

'काय काय झालं ते सांगा पाहू.' मला बारमध्ये ढकलून सार्जंट म्हणाला.

'ठीक आहे, पण असं झाल तरी काय ?'

'खून ! एक तासापूर्वी मैदानाजवळच्या एका हॉटेलात. वेटरनं त्याला तिच्या खोलीबाहेर पडताना पाहिलं. लिफ्टऐवजी तो जिन्यावरून उतरल्यामुळं वेटरला त्याचा संशय आला. स्पर्धांच्या वेळी असख्य भामटे आसपास वावरतात. त्या इसमाला स्पष्ट बघितल्यामुळं त्यानं लगेच तिथल्या डिटेक्टिव्हला सांगितलं. त्याला ती पोरगी बिछान्यावर अस्ताव्यस्त पडलेली दिसली. तिची अवस्था फार वाईट होती !'

मी एक दीर्घ श्वास घेतला. 'तो माणूस चांगला सशक्त होता. डोक्याला टक्कल. ५० साली इथे झालेल्या खुनाबद्दल तो बोलत होता; पण मला वाटलं खूप प्यायल्यामुळं तो तसं बडबडत असेल !'

'त्याचं वर्णन बरोबर जुळतं.' सार्जंटनं माझ्याजवळच्या बॅगकडे पाहिलं. 'त्याच्याकडेही अशीच बॅग होती. म्हणून तर आम्ही त्याचा पाठलाग करू शकलो.'

'कोणी वाटेत तुम्हाला सागितलं का ?'

सांगायची गरजच नव्हती. त्यानं तिला चिरून काढलं होत. तो आलेल्या मार्गानं रक्ताचे थेंब आढळले आणि हे बघा—स्टुलाखाली जमिनीवर काय दिसतंय !'

मी बघितलं.

'त्याच्या बॅगमध्ये चेंडू नव्हताच आणि चेंडू कधी ठिबकत नाही.'

मी एका स्टुलावर बसलो. मला गरगरू लागलं होतं. तिथलं रक्त मला आधी दिसलं नव्हतं.

तेवढ्यात एक पोलिस बारमध्ये आला. तो धावत आला, पण त्याचा चेहरा लाल पडला नव्हता. तो हिरवट पाढरा दिसत होता.

'सापडला ?' सार्जंटनं विचारलं.

'त्याचं जेवढं काही उरल होतं ते मिळालं!' पोलिस दूर बघत म्हणाला, ' 'तो काही थाबेना. आम्ही त्याच्या डोक्यावरून गोळ्या झाडल्या. तो रुळामधून धावत होता आणि मालगाडी त्याच्या अगावरून गेली!'

'मेला ?'

पोलिसानं होकार दिला. 'लेफ्टनंट तिथे पोहोचले आहेत. त्याला रुळावरून

खरवडून काढावं लागेल!" त्यानं कपाळावरचा घाम पुसला.

'आता आपल्याला नक्की कळायला मार्ग नाही. कदाचित तो भुरटा चोरही असू शकेल !" सार्जंट म्हणाला.

'पण त्याची बॅग मिळाली आहे. त्यावरून पत्ता लागेल ! "

दुसरा गस्तवाला पोलिस आत आला. त्याच्या हातात एक बॅग होती.

'हीच त्याच्याजवळ होती ना ?' सार्जंटनं मला विचारलं.

'होय,' मी म्हणालो. माझा घसा कोरडा पडला.

मी मान वळवली. उघडलेली बॅग मला बघायची नव्हती. ते आत डोकावून बघत असताना मला त्यांचे चेहरे बघायचे नव्हते; पण मला ऐकू आलंच !

मी सार्जंटला जबाब दिला. माझं नाव आणि पत्ता त्याला हवा होता तोही मी त्याला दिला. नंतर मी त्यावर माझी सही केली.

माझं आणि त्या अनोळखी इसमाचं झालेलं सगळं संभाषण त्यांना सांगितलं. एकट्या–दुकट्या माणसांना मारण्याबद्दलचे त्याचे विचारही ऐकवले.

सार्जंट म्हणाला, 'जुन्या काळातला खुनी इसमच पुन्हा आलेला दिसतो. त्याच्या सगळ्या सवयी पोलिसखात्याला पाठ आहेत. इथली परिस्थिती फारच तापली तेव्हा तो वीस वर्षांपूर्वी नाहीसा झाला. पुन्हा पहिल्या सारखी 'ओढ' निर्माण झाली असेल, म्हणून तो परत आला!'

'पण का ?' मी विचारलं.

'कोणास ठाऊक ? कदाचित त्याचा तोच छंद असेल. एक प्रकारचा खेळच ! पण त्याच्या धाडसाची कमाल आहे. गर्दीतलं ठिकाण निवडून त्यानं कामगिरी उरकली आणि बॅगेत हे भरून—' त्यानं माझा चेहरा पाहिला आणि तो बोलायचं थांबला. माझ्या खांद्यावर हात ठेवून तो म्हणाला, 'सॉरी, तुम्हाला काय वाटत असेल याची मला कल्पना आहे. तुम्ही थोडक्यात बचावलात ! खुद्द त्याच्याशी काही काळ बोलत बसलात. जगातल्या सर्वांत कुप्रसिद्ध विकृत खुन्याबरोबर! तुम्ही खरोखर नशिबवान आहात!'

मी मान डोलावून दाराकडे निघालो. अजूनही मला रेल्वे मिळण्याची शक्यता होती आणि सार्जंटचं म्हणणं मला पटलं होतं.

मी खरोखरच नशीबवान होतो. म्हणजे असं की त्या अखेरच्या क्षणी, तो बुद्दू, भुरटा चोर बारमधून बाहेर पडत असताना मी त्याला गळणारी बॅग हातात दिली. केवळ माझ्या नशिबानं मी केलेली बॅगांची अदलाबदल त्यानं पाहिली नाही.

□

[ मूळ लेखक–रॉबर्ट ब्लॉक ]

# रंगभूमी

## वस्त्रहरण

### कृत्रिम तंत्रबाजी टाळून जन्मलेला उत्स्फूर्त आविष्कार

कुठलीही नवी गोष्ट पाहायला जाणाऱ्या पुणेकराच्या चेहऱ्यावर दिसणारे 'बघू, काय करताय ते ? नाही तर–' असे अत्यंत टवाळ आणि कुत्सित दुःशासनी भाव घेऊनच मी 'ॐ नाटचगंधा' चे 'वस्त्रहरण' पाहायला गेलो. त्यात अशी एखादी गोष्ट एखाद्या बुजुर्गाने बरी म्हटलेली असली की 'अंः, त्याला काय कळतंय' अशी दुधारी धार त्याला चढलेली असते. तर असा सगळा जामनिमा बरोबर घेऊन रंगमंदिरात बसलो. पडदा बाजूला गेला आणि उजव्या बाजूच्या विंगेतून टाळ्या–शिट्ट्यांचा गजर झाला. म्हटलं, चला, आपलं हेही काम नाटकवाल्यांनीच उरकून टाकायचं ठरवलेलं दिसतंय. तेवढ्यात स्टेजवरच्या स्टेजचा पडदा बाजूला सारून एक मध्यमवयीन माणूस डोकावला. सोगा सोडलेले धोतर, सोगा कधी डाव्या हातात, कधी अंगातल्या किरमिजी जाकिटाच्या खिशात, पांढराधोक नेहरू शर्ट आणि पुढारीपणाचा कोन दाखवणारी गांधी टोपी–अशा त्या माणसाने टिपेच्या आवाजात विनंती केली, 'गडबड करू नका. नाटक लवकरच सुरू होतंय.' पण बराच वेळ सांगूनही पब्लिक ऐकत नाहीये, म्हटल्यावर स्वारी खवळली आणि त्याने दरवर्षी होणारा कार्यक्रम, त्याला सरपंच या नात्याने त्याने स्वतः भरलेली सर्वात जास्त वर्गणी या सगळ्याचा आधार घेत असा काही हग्या दम भरला की गडबड करणाऱ्यांची तोंडे एकदम बंद झाली !

आणि या पहिल्या झटक्यापासून 'काळभैरव महाकाली संगीत नाटक मंडळी' या स्थानिक कंपनीतर्फे मुक्काम पोस्ट डुडुळवाडी खुर्द किंवा अवसरी बुद्रुक गावी चाललेल्या संगीत वस्त्रहरणाच्या खेळात मी पुरता लपेटला गेलो. खेळ सुरू व्हायचा होता. निरनिराळ्या अडचणी येत होत्या आणि तात्या सरपंचांपासून कुलकर्णी मास्तरांपर्यंत सगळेच जण ते घोळ निस्तरण्याचा कसून प्रयत्न करीत होते. या सगळ्याचा त्रयस्थ साक्षीदार बनून मी मात्र फक्त पोटभर हसण्याचे काम करीत होतो.

नाटकाच्या वाद्यवृंदाची आघाडी सांभाळणाऱ्या गणेश प्रासादिक मंडळीतील ( म्हणजे तात्यांच्या भाषेत गप् रहा मंडळी) एकाची आजी वारल्याने नाटकासाठी येत नसल्याचा निरोप आल्याने संगीत वस्त्रहरण संगीताशिवायच करण्याचा निर्णय घेतला गेला. नाटक सुरू होणार तोच नारळ फोडायचा राहिला म्हणून कुलकर्णी मास्तरांनी नांदी

अर्धवट थांबवून नाटक बंद केले. नारळ फोडल्यावर योगायोगाने गप्‌ रहा मंडळीचे लोकही आले. कारण ती आजी म्हणे तिरडीवरच उठून बसली !

आणि नंतर मग तुम्ही कोणताही घोटाळा मनात आणा, तुमच्या कल्पनेतील घोटाळ्यापेक्षा सवाशे ब्रह्मघोटाळा वस्त्रहरणमध्ये तुम्हाला सापडेल !

त्यात हे संकल्पित कार्य निर्विघ्न पार पडण्याबद्दल राक्षसांना आज्ञा करणाऱ्या देवाला 'ओ, लवकर आटप ! आता म्हण, तपच्या आयुष्याची दोरी माझ्या हातात आहे. आत गेल्यावर तुला दाखवतो,कोणाची दोरी कोणाच्या हातात आहे!' असा बेधडक उघड दम भरणारे राक्षस आहेत.

प्रेक्षकात बसलेल्या मंजुळाबाईचा नाच पाहण्याचा हट्ट धरून बसलेला देव आहे.

नाटक चालू झाल्यानंतर मंजुळाबाईलाच खाणाखुणा करणारा युधिष्ठिर आहे. आपले गाणे झाल्यानंतर टाळ्यासाठी वाट पाहणारा दुःशासन आहे. 'चष्मा काढल्यावर मला काही दिसणारच नाही.' असे म्हणून चष्मा घालून वावरणारा आंधळा धृतराष्ट्र आहे. कंसातील वाक्यासकट संवाद म्हणणारी पात्रे आहेत. आपल्या खऱ्या बायकोला पो र गं झा ल्या च्या आ नं दा त दारू पिऊन लास पडणारा आणि आपले 'वस्त्रहरण' नाटकच विसरून जाणारा द्रौपदी आहे आणि अशा 'तो' द्रौपदीच्या ऐवजी नाटकात 'ती' द्रौपदी आल्यानंतर 'माझ्या खऱ्या बायकोदेखत मी काही परक्या बाईच्या पदराला हात घालणार नाही.' असे ठणकावून सागून नाटक सोडून जाणारा दुःशासनही आहे.

पण सगळ्यामध्ये सर्वांत उठून दिसतात ते तात्या सरपंच (मच्छिंद्र कांबळी), कुलकर्णी मास्तर (रमेश रणदिवे–हे नाटकाचे दिग्दर्शकही आहेत). आणि गोप्या (दिलीप कांबळी).

'वस्त्रहरण' चे लेखक आहेत गं. म. गवाणकर. कोकणातील खेड्यामध्ये होणाऱ्या नाटकांमधील अनेक गमतीदार तुकडे एकत्र जोडून बेतलेला हा वस्त्रहरणाचा प्रयोग. यातील कित्येक तुकडे यापूर्वी पुलंच्या बहुरूपीतून, वाऱ्यावरच्या वरातीतून किंवा अशाच कुणाकुणाच्या लिहिण्या–बोलण्यातून आपल्या डोळ्या-कानांवर पडलेले; पण तरीही 'वस्त्रहरण' मध्ये ते अशा चपखलपणे आणि उत्स्फूर्तपणे सादर होतात की त्यांचा पूर्वीचा संदर्भही अधिक ताजेपणा, अधिक जिवंतपणा लेवून गुदगुल्या करतो आणि आपण फक्त हसत राहतो अनेक ठिकाणच्या साखळ्या एका नाटयकृतीच्या दुव्यात बंदिस्त करताना प्रत्येक साखळी अधिक (किमान कमी तरी नक्कीच नाही) रंजक होत जाईल आणि तरीही या दुव्यात तुटकपणा जाणवणार नाही याची खबरदारी गवाणकरानी घेतली आहे. त्यात विनोदी घटनाप्रमाणे समूहगीते, समूहनृत्ये आणि एक लावणी+नाच येतात तेही अतिशय चपखलपणे आणि त्यातही मूळ दुव्याचे विनोदी सूत्र कुठेही हरवत नाही वा तुटत नाही. नाटकाला भाषेपासून व्यक्तिरेखांपर्यंत सगळ्याचीच पार्श्वभूमी कोकणची मिळाली आहे. (नाटकाची सुरुवात मालवणीतच झाली; पण काही हुकमी विनोदांना हशा न झाल्याने मग नाटक मंडळीनी मराठीला कोकणी झाक मारून केले. खरे तर असे करण्याची विशेष आवश्यकता नव्हती. अर्थात मराठीकरण करून नाटकाला काही बाध आला नाही; पण मालवणीने ते जास्त खुलले असते.) कोकणी माणसाचा इरसालपणा, दिलखुलासपणा, देवभोळेपणा, उत्साह, खवचटपणा सगळे टिपताना गवाणकरानी प्रत्येक व्यक्तिरेखा जास्तीत जास्त ठसठशीत केली आहे. संपूर्ण नाटकात दोन-पाच वाक्ये असलेल्या राक्षसांपासून ते संपूर्ण नाटकभर वावरणाऱ्या तात्या सरपंचापर्यंत प्रत्येक पात्र प्रेक्षकाच्या लक्षात राहते. नाटकात जाणवणारा एक प्रमुख दोष म्हणजे पुनरुक्ती. (याची जबाबदारी कोणाची, हे लेखक व दिग्दर्शक यांनी आपापसात साठमारी करून मिटवावे). अशा जागा कमी असल्या तरी नाटकाला त्या काहीशा खीळ घालतात एवढे खरे. नाटकात चावटपणा भरपूर आहे किंवा 'धू म्हटले की धुवावे, मधे काय लोबते आहे, विचारीत बसू नये!' अशी एकदम खुल्लम्‌ खुल्ला वाक्येही भरपूर; पण हे सगळे नाटकात अशा काही प्रवाही रीतीने येते की तो ओढूनताणून केलेला प्रकार न वाटता अत्यंत सहज आवश्यक आणि त्यामुळेच समर्पक वाटतो. (याउलट 'अरे चोरा' मध्ये अरुणा काटकर अर्थात भक्ती बर्वेच्या आतल्या कपड्यावरून केलेले विनोद सुरुवातीला एक–दोन वेळा सहन करता येतात, नंतर मात्र त्यातील विनोदी पांचटपणा अधिकाधिक सुकायला लागतो.) 'घाशीराम' पासून बेतीव नाटकांमध्ये नाच, गाणी, नकला, कवायती अर्थात समूहदृश्ये इत्यादीच्या गोळा–बेरजेचा जो एक नवीन घाट सुरू झाला होता, त्यातील खोटया प्रायोगिकतेची वा मोडीत गेलेल्या नाविन्याची जागा अत्यंत उत्स्फूर्त व मुक्त आविष्काराने घेतल्यामुळे 'वस्त्रहरण' बेतीव नाटक असूनही वेगळे वाटते. संहिता वा आविष्कार या दोन्ही दृष्टीनी 'वस्त्रहरण' हे classic असल्याचा वा 'रंगभूमीच्या वाटचालीतील मैलाचा दगड' वगैरे असल्याचा दावा त्याचे लेखक वा दिग्दर्शकही करणार नाहीत. (वस्त्रहरणमध्ये काही ठिकाणी देव, धर्म वगैरे कल्पनाची उत्तम खिल्ली उडवली आहे; पण त्याबाबतही लेखक गवाणकराचे उत्तर मूर्तिभंजक परंपराविरोधकाचे नाही; तर मी ते लोकाना हसविण्यासाठी, करमणूक म्हणून केले.' असेच साधे सरळ आहे.) तर 'वस्त्रहरण'चा उद्देश सरळ सरळ फक्त करमणुकीचा आहे; पण तरीही वस्त्रहरण मनात ठसते, मेंदूच्या एका कप्प्यात सतत जिवंत राहते ते त्यातील कलाकारांमुळे, त्यांच्या अत्यंत अफलातून जिवंत अभिनयामुळे (अर्थात संहितेच्या रूपाने आणि नाटकाच्या प्रत्यक्ष आविष्कारातील पात्राच्या हालचाली व संरचनाद्वारे लेखक आणि दिग्दर्शकाचाही यात वाटा अर्थातच आहे.) राक्षसापासून दुःशासनापर्यंतच्या बारीकसारीक भूमिकांचा उल्लेख याआधी मी केलाच. राहता राहिले तात्या सरपंच, कुलकर्णीमास्तर आणि गोप्या.

मधू आपटेसारखी रंगभूषा केलेल्या, त्याच्याप्रमाणेच तोतरे बोलण्याची ढब उचललेल्या दिलीप कांबळेने गोप्याची भूमिका केली आहे. हा माणूस नाटकाऐवजी जर जिम्नॅस्टिकमध्ये गेला असता तर या वर्षी रशियाच्या दित्यानिनचे काही खरे नव्हते. अक्षरशः रबरमॅनप्रमाणे लवचिकपणा, आत्यंतिक चपळाई आणि या आंगिक अभिनयाइतकाच किंबहुना अधिकच समर्थ मुद्राभिनय यांच्या जोरावर गोप्याने चाळीस टक्क्यांइतके नाटक खाऊन टाकले. मंजुळाबाईच्या

नाचाच्या वेळीसुद्धा बाईपेक्षा गोप्यानेच जास्त शिट्ट्या घेतल्या.

गोप्याच्यापाठोपाठ क्रमांक कुलकर्णी-मास्तर आणि तात्या सरपंचांचा. त्यांच्या अभिनयातील, looks gestures आणि हालचालीतील बारकावे सांगणे म्हणजे संपूर्ण नाटकच फोडून फोडून परत लिहिण्यासारखे आहे. शिवाय अशी पानेच्या पाने वर्णने वाचण्यापेक्षा प्रत्यक्ष पाहूनच हा अनुभव घेणे अधिक योग्य. जर कुणी नाटकाची फक्त संहिता वाचली वा नाटकाची 'ष्टोरी' सगळ्या घटनांसकट सांगितली ; तर कदाचित 'यात एवढं विनोदी काय आहे बुवा ?' असा प्रश्न मनात डोकावेल; पण सगळ्या कलाकारांच्या सामूहिक आविष्कारातून जन्मणारा हा अनुभव इतक्या चढ्या क्रमाचा आहे की त्यामध्ये पूर्वी हे माहीत असणे, पुनरुक्ती होणे इत्यादी प्रकारही वाहून जातात.

एखाद्या खेड्यातील स्टेज, त्याला (काल्पनिक) पडदा म्हणून सरकदोऱ्या बांधलेल्या, या स्टेजच्या बाहेरच्या बाजूला रंगवून ठेवलेले कळकट बोर्ड या सगळ्यासकट नेपथ्यही फर्मास उभे केले होते. शिवाय प्रत्येक पात्राला त्याच्या व्यक्तिरेखेनुरूप दिलेली फिट्ट वेशभूषा हेही 'वस्त्रहरण'चे उल्लेखनीय वैशिष्टच !


'वस्त्रहरण' आणि 'अरे चोरा' (अरे चोरा'मधील फक्त अंकांच्या शेवटी असलेले प्रकाश-चमत्कार वगळता) दोन्ही नाटके स्वच्छ आणि पुरेशा पांढऱ्या प्रकाशात घडतात. हल्ली नाटकांतून केलेली अनावश्यक आणि बेसुमार रंगीत दिन दिन दिवाळी पाहता तर हा पांढराशुभ्र प्रकाश म्हणजे एक सुखद धक्का होता.

नाटकाच्या गरजेप्रमाणे सर्व कृत्रिम तंत्रबाजी आणि गिमिक्स टाळून कलाकारांच्या सामूहिक प्रयत्नातून जन्मलेला उत्स्फूर्त आणि मुक्त आविष्कार हे 'वस्त्रहरण'चे यथार्थ वर्णन ठरेल.

—सदानंद बोरसे


"कठीण आणि खरखरीत टूथ पावडरी तुमच्या हिरड्या नि दातांना इजा करू शकतात..."

कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — श्वास दुर्गंधीही थांबवा !


कोलगेट टूथ पावडर अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हलुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटींत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.

TP.G.30 MB

हिंदी चित्रपट

# थोडीसी बेवफाओी

## एक न पाहिलेला चित्रपट !

'गम तो अिस बात का है, वह अहदे–वफा टूट गया। बेवफा कोअी भी हो, तुम न सही, हम ही सही।' असा अेक "वाह्, क्या बात है।" शेर आणि त्याच्याखाली बरेचसे चांदणे, बरीच फुले, कळ्या अित्यादी नाजूक मुलायम कच्चा माल वापरून लिहिलेले एक गद्यकाव्य अशी जाहिरात करीत लेखक–दिग्दर्शक अिस्माअिल श्रॉफ यांची 'थोडीसी बेवफाई' ही काव्यमय प्रीतिकथा प्रदर्शित झाली.

अरुण ( राजेश खन्ना ) आणि निमा ( शबाना आझमी ) यांचे प्रेम जुळते. काही दिवस ठीक गेल्यानंतर अचानक अरुणची काही तरी भानगड असल्याच्या खोट्या संशयावरून दोघांमध्ये दुरीची दरार ते दीवार काहीही उभी राहते. दरम्यानच्या काळात दोघांनी एका पुत्ररत्नाला–सुशांत रे (अभिनंदन ऊर्फ नंदू ) भूतलावर आणलेले असते. त्याच्यामुळेच दोघांचे मीलन होते. दरम्यानच्या काळात घरच्या व्यक्तींसाठी–सावत्र आअी, दोन बहिणी, अेक पोलिओ झालेला भाऊ–अरुणची चाललेली धडपड, त्यातूनच त्याने मिळविलेले वैभव आणि याउलट निमाचा ताठर स्वभाव, तिच्या भावांनी केलेली मानहानी आणि या दोन्हींचा मुख्यतः अरुण व निमाच्या भेटींमधून घडणारा सुप्त संघर्ष घडत असतो. अखेर 'पतीचे घर हाच स्वर्ग, तेथे असणारे दुःखही अन्य सुखांपेक्षा फार मोठे असते.' असा खास भारतीय नारीसंदेश देऊन चित्रपट संपतो. खरे म्हणजे चित्रपटाच्या कथेत वा ती पडद्यावर दाखवताना घेतलेल्या शैलीत काही खासियत आहे, असे काही नाही; पण संपूर्ण चित्रपटात बहुतेक प्रसंगांमध्ये टाळलेला भडकपणा आणि नाच व हाणामाऱ्या या प्रकारांना दिलेली रजा या गोष्टींमुळे चित्रपट फारच सुसह्य बनला आहे.

स्वतःची जाडी अतिशय कमी केल्यामुळे आणि वेगवेगळ्या पॉश कपड्यांमुळे राजेश खन्ना आराधना वा दो रास्तेच्या काळाची याद देतो. पडद्यावरील बहुतेक प्रसंगांमधील भडकपणा आणि अतिनाटकीपणा टाळण्यात तो आणि शबाना आझमी यांचा वाटा अत्यंत महत्त्वाचा; अन्यथा सावत्रपणा, मुलाची जुदाई अित्यादी गोष्टी हाताशी तयार असताना आसवांचे दळण घालणे अशक्य नव्हते. अेक प्रसंग मात्र शबानाने नकळत विनोदी बनवून टाकला आहे. भांडून तणतण करीत ती अरुणचे घर सोडून जाते; पण दारातून बाहेर पडताना ( पाय घसरल्यामुळे असेल वा साडीत पाय अडकल्यामुळे असेल ) शबाना वाअीट धडपडली आहे. एखादा माणूस आत्यंतिक तोऱ्यात रस्त्यावरून जात असताना अचानक केळ्याच्या सालीवरून घसरून भुईसपाट व्हावा, तसा तो प्रसंग वाटतो. या दोघांव्यतिरिक्त काही पात्रांनी मात्र पडद्यावर फारच त्रास दिला. सुशांत रेचा अशा त्रासदायक लोकांमध्ये पहिला क्रमांक ! एकसुरी बोलणे, चेहऱ्याच्या चमत्कारिक हालचाली आणि ऋषिकपूरची नक्कल करण्याचा एक व्यर्थ प्रयत्न यांच्या मिश्रणाने त्याने अभिनंदन उत्तम बिघडवला. डॉ. करुणाचे काम करणारी अभिनेत्रीही अशीच तापदायक.

चित्रपटातील प्रसंगांमध्ये अभिनयात टाळलेला भडकपणा मोअिनुद्दीन नावाच्या महाशयांनी संवादांमध्ये भरून काढला आहे. एकही पात्र साधे सरळ कळेल असे बोलायला तयारच होत नाही. प्रत्येकजण सुभाषिते आणि फक्त सुभाषिते बोलतो. कधीकधी ही सुभाषिते अत्यंत जडजड उर्दूत असतात एवढाच काय तो फरक. बाकी पात्रांबद्दल एक वेळ मी समजू शकतो; पण नाशिक शहरातील कोर्टात काम करणारा न्यायाधीशही जेव्हा लखनवी उर्दूमध्ये निकाल ऐकवायला लागला; तेव्हा मात्र राष्ट्रीय एकात्मता म्हणतात ती हीच याचा साक्षात्कार झाल्यावाचून राहिला नाही.

चित्रपटातील गीते गुलजारची, संगीत खय्यामचे. हजार राहें मुडके देखी' या द्वंद्वगीताचे छायचित्रण छान घेतले आहे. वाद्यांचा खणखणाट व गडगडाट टाळला असल्याने बाकी गाणीही गोड वाटतात. 'मौसम मौसम, लव्हली मौसम' हे गाणे पाहणे आणि त्यातील बुवाचा आवाज ऐकणे म्हणजे मात्र शिक्षा आहे.

तळटीप–या वेळी ठरवून टाकले की, आपली नेहमीची पद्धत बदलायची. आजपर्यंतच्या अनुभवावरून खरे म्हणजे फार पूर्वीच लक्षात यायला हवे होते की, बिचारे हिंदी सिनेमावाले प्रेक्षकांचे फार कष्ट वाचवण्याचा प्रयत्न करतात. त्यांना एकदा समजलेल्याच कथा, त्यांनी पाहिलेल्याच नटनट्यांच्या तोंडून ऐकलेलेच संवाद वदवीत पुन: पुन्हा पडद्यावर सादर करतात आणि शिवाय त्यांची करमणूकही करतात. तर हे आधी कळले होतेच; पण उशिरा का होईना नीट कळल्यानंतर निदान या लेखापुरती तरी आपली पद्धत बदलायची आणि एक नवा प्रयोग करून पाहायचा, असे ठरवले.

म्हणजे आधी चित्रटावर लिहायचे आणि मग चित्रपट बघायचा आणि मग किती ठोकताळे आणि अंदाज बरोबर आले ते ठरवायचे. त्याप्रमाणे 'थोडीसी बेवफाई'वर लिहिल्यानंतर आणि चित्रपट बघितल्यानंतर फारच किरकोळ व जुजबी बदल करावे लागले. या प्रयोगात चित्रपटाची जाहिरात आणि रेकॉर्ड यांचे मोलाचे साहाय्य लाभले.

–प्रतिनिधी

मराठी पॉकेट बुक्स
* नवी पुस्तके * प्रत्येकी २ रुपये * सर्वत्र मिळतात.